# दत्तकपणा 3

...नेविल सर्वांना, शुभ सकाळ. आपण खूप आनंदीत आहोत कारण पुन्हा जो सर्व भरपूरी देतो त्या येशू ख्रिस्ताच्या नावात तुम्हाला शुभेच्छा देण्यासाठी आपणाला एकत्र केले आहे. विश्वास ठेवतो की तुम्हाला हा महान आठवडा त्याच्या स्तुतीचा आणि आशीर्वादाचा गेला आहे.

2 ह्या सकाळी येताना, तेथे एका मुलास भेटलो आणि त्याने मला एक लहान कोरलेली मुर्ती दिली जी पहारा देणाऱ्या दूताची होती जे दोन लहान मुलांवर लक्ष देत होते. आणि मला हे माहीत नव्हते की तो डॉल्टन आडनावाचा, लहान डॉल्टन मुलगा.

3 आणि येथे काही आठवड्यांअगोदर, किंवा काही...जवळ जवळ दोन आठवड्यांअगोदर, तेथे एक वडील, ख्रिस्ती वडील, तो प्रार्थना रांगेत उभे असताना, आपल्या तरुण वयातील मुलीकरिता मागितले, जी अजून ख्रिस्ती झाली नव्हती. आणि पवित्र आत्मा बोलला, "मी—मी तुला तुझे मूल देतो." आणि आजच्या सकाळी ती येथे आहे., तारण झालेली आणि प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतलेली, येथे मंचावर बसली आहे, त्याप्रमाणे पवित्र आत्मा बोलला. आणि इतर मुले सर्व सभोवती बसली आहे. मला ठाऊक आहे की डॉल्टन कुटूंब आनंदी आहे.

4 पाहा तेथे छोटी बाई आहे त्यांनी मागील रविवारी बाळासाठी प्रार्थना करुन घेतली, जे मरणार होते. मी पाहतो आज ह्या सकाळी ते आपल्याबरोबर आहे, आणि त्या बहिणीसाठी, आम्ही आनंदी आहोत. त्यांना वाटले त्याला स्नायूचा विकृतीचा आजार झाला आहे, आणि त्यास तो नव्हता. त्यासाठी आम्ही खूप आभारी आहोत.

5 पाहा, सर्व आपले चांगले मित्र. मला आठवते तो मनुष्य माझ्याकडे एक खास मुलाखत घेण्यासाठी एकदा चौटूका येथे—येथे आला होता. मी विश्वास करतो ते तसे होते. मी तुझ्या आणि तुझी पत्नी आणि मुलांसोबत नाश्ता केला; हे मी विश्वास करतो... किंवा तू आणि तुझी पत्नी, किंवा मुले, होय, सुध्दा. [एक भाऊ म्हणतो, "मीडल टाऊन"—सम्पा.] मीडल टाऊन, येथे...परंतु आम्ही सगळे...मी ते नाव विसरलो, म्हणून मी सहज त्यास चौटूका असे म्हटले. होय, महाशय...माझे कितीतरी चांगले मित्र.

6 भाऊ चार्ली कॉक्स आणि येथील बहीण नेली, जे माझ्यासाठी दुसरे घर आहे, आणि काहीच नाही परंतु तुम्ही माझी स्वतःची मुले होऊ शकता. मी तेथे जातो, तेथे माझा बहुतेक वेळ आरामासाठी घालवितो, खाली तेथे. मी इंडियानामधील तर तो केंटकी येथे एक उत्तम खारीचा शिकारी आहे. आणि म्हणून इंडियाना...आणि चार्ली, मी तुम्हाला सांगतो माझी खूप, उत्कट इच्छा आहे, भयानक वाटते जसे मला त्यांतील काही क्रॅपीस मासे किंवा स्ट्रीपबास मासे पकडाव्याश्या वाटतात तेथे जाण्याअगोदर. मला खरेच असे वाटते जसे काही मी खूप उभा राहू शकतो.

7 भाऊ पारनेल...दक्षिण कॅरोलिना येथील. आणि भाऊ...ठीक आहे, किती तरी जण वेगवेगळे वेगवेगळ्या ठिकाणांहून, येथे ह्या सकाळी आम्हाला भेटण्यासाठी आले आहेत.

8 तुम्हाला ठाऊक आहे, येथे आपले नेहमीचे सभासदत्व नाही. आपण फक्त एकमेकांबरोबर सहभागिता करतो, येशू ख्रिस्ताचे रक्त, देवाचा पुत्र, सर्व अनीतीपासून आपणास शुध्द करतो.

9 आता, आपण अद्भूत अभ्यास करीत आहोत, खरेच वैभवशाली. आणि आपण किमान मला...ठाऊक आहे मी त्याचा आस्वाद घेत आहे, आणि मला ठाऊक आहे तुम्ही सर्व सुध्दा त्याचा आस्वाद घेत आहात. मी कधीतरी पूर्ण दिवसात त्याविषयी, बोलण्याची किंवा वाचण्याची सुरुवात करतो, मी दोन वचने घेतो आणि मी त्या वचनांतून सुरुवात करतो आणि, प्रथम गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, मी उत्पत्ती पासून प्रकटीकरणापर्यंत केले, अजूनही चालू आहे.

10 आणि, तुम्हाला ठाऊक आहे, मला वेळ घ्यायला आवडेल जेथे आपण—जेथे आपण घेऊ शकू जेथे आपण इब्रीकरांस पत्र घेऊ शकू, आणि अशा प्रकारे घेऊ... जेव्हा खारीचा हंगाम येतो, जसे सप्टेंबर...ऑक्टोबर...ऑगस्ट, तुम्हाला ठाऊक आहे, आणि सतत चालू राहतो, जोपर्यंत परदेशी जाण्याची वेळ येते, प्रत्येक रात्री इब्रीकरांस पुस्तकावर, किंवा निर्गमाचे पुस्तक. देव कसे, निर्गमन, त्याच्या लोकांना मिसरांतून बाहेर काढतो, निर्गमन! फार सुंदर दर्शक आपल्यासाठी जे आता आपण निर्गमनासाठी तयार आहोत. ही, ओह, ही फारच सुंदर गोष्ट आहे. पूर्ण वचन एकत्र बांधलेले आहे, आणि ती एक मोठी गोष्ट आहे.

11 आता, ह्या सकाळी आपण—आपण अजूनही पुस्तकात...आपण इफिसकरांच्या पुस्तकातून पहिले तीन अध्याय घेणार आहोत. पौलाचे इफिस येथील इफिसकरांस पत्र, मंडळीला योग्य ठिकाणी नेण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि आपण तेथे पोहचण्याअगोदर, आपण आणखी थोडे क्षण किंवा दोन प्रार्थनेसाठी देऊया, आपण करण्याआधी.

12 ओह प्रभू, आमच्या देवा, आम्ही आता तुझ्या उपस्थितीमध्ये येत आहोत, आम्ही खूपच अपात्र आहोत, तरीही आम्हाला ठाऊक आहे की तेथे रक्ताचे अर्पण वाट पाहात आहे, आम्हाला सर्व अशुध्दतेपासून शुध्द करीत आहे, आणि देवापुढे आम्हाला, निष्कलंक, निर्दोष असे सादर करीत आहे. आपण ते गुणवत्तेने कधीच करु शकत नाही. परंतु कारण येशूने हे आपणासाठी केले, आपण नम्रतेने त्याच्या उपस्थितीत आणि त्याच्या नावात झुकूया, मागूया की त्याने ह्या सकाळी आमच्यामध्ये पवित्र आत्मा पाठवावा. आणि एक देवविषयक गोष्टी जाणणारा किंवा वचने व्यवस्थित जाणणारा म्हणून नव्हे, परंतु पवित्र आत्म्याविषयी उत्साह व्यक्त करणारा आणि कृतज्ञ असणारा जेव्हा तो आमच्यामधून फिरत आहे, तो आम्ही वचन वाचन असता सर्वांना तो एकत्रितरित्या आशीर्वादित करो, की ते आम्हासाठी सार्वकालिक जीवन व्हावे. ते मान्य कर, पित्या. आम्ही ते येशूच्या नावात आणि येशू करिता मागतो. आमेन.

13 आता मी प्रथम, येथे असे सांगेन, की जर कधी मी असे काही बोलेन ज्यास तूम्ही सहमत नसाल, योग्य वाटत नसेल, तुमच्या शिक्षणानुसार पूर्ण चुकीच्या असतील, किंवा काही गोष्टी ज्यास तुम्ही सहमत होऊ शकत नाही, मी पवित्र आत्म्याचा विश्वास करतो, की तो ते मोसमी आणि इतके गोड करील जोपर्यंत...ते तुम्हाला दुखविणार नाही. पाहा? ते—ते प्रेम आणि सहभागितेद्वारे होईल, ते असे आहे...ते तशाप्रकारे बनविले आहे.

14 आणि ह्या सर्वांची सुरुवात गेल्या रविवारी प्रवचनाने झाली, मी विश्वास ठेवतो, की ते गेल्या रविवारी सकाळी, *एक नाकारलेला राजा*. कोणाकडे ती टेप अजूनही आहे का? मला वाटते त्यांच्याकडे त्या आहेत, आणि जर तुमची इच्छा असेल तर त्या तुम्हाला मिळू शकतात, *एक नाकारलेला राजा*.

15 आता काही दिवसात आणि आपण मिडलटाऊन, ओहीओ येथे...सुरुवात करणार आहोत. आम्हाला ते सर्व निश्चित हवेत ज्यांना त्या—त्या वेळेत सुट्ट्या आहेतच, ह्यासाठी आपण सर्व तेथे भेटू, कारण आम्ही मिडल टाऊन, ओहीओ येथे फार

मोठ्या सहभागितेची अपेक्षा करीत आहोत. मला वाटते, डॉक्टर सुलीवन हे त्या समितीचे अध्यक्ष आहेत. आणि तेथे पाच रात्रीच्या त्या असतील, मी पाहूणा वक्ता म्हणून आंतरसंप्रदायाच्या मंडळीच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात प्रचार करणार आहे. आणि त्या—त्यानंतर, आपल्या स्वतःच्या सभा चालू होतील. आम्ही त्या बारापर्यंत चालू ठेवणार आहोत, परंतु अशाप्रकारे प्रयोजन आहे की आपण त्या आणखी दुसऱ्या आठवड्यापर्यंत चालू ठेवू, पवित्र आत्मा कशाप्रकारे प्रेरणा देतो त्यावर हे अवलंबून आहे. आम्हा सर्वांची इच्छा आहे की आत्म्याच्या प्रेरणेने चालावे; आत्मा जे काही करण्यास सांगेल, तर ते त्वरित करु.

16 आणि आपण लक्षात ठेवूया की आपण आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालत असता, एक महान धडा जो आपल्याला शिकायचा आहे की कधीही घाई करु नका. पाहा, तुमचा वेळ घ्या, विश्वास ठेवा. जर आम्ही देवाकडे काही मागितले, लक्षात ठेवा, देव प्रार्थनेचे उत्तर देतो. तो त्याच्या वेळेनुसार देतो, उत्तम त्या मार्गाने, आपल्यासाठी योग्य ते करतो. आणि जर ते तसे नसेल, तर आपण ह्या सकाळी येथे काय करीत आहोत? आपण ख्रिस्ती आहोत असा दावा करीत आहोत?...जर हा देवाचा शब्द नसेल, तर तो खरा नाही, तर मग आपण अशा लोकांत आहोत जे अत्यंत दीन आहेत.

17 मला येथे हृदय इतरांबरोबर जुळविण्यास अत्यंत आनंद होत आहे ज्यांना ठाऊक आहे की हे कधीही न पडणारे देवाचे वचन आहे. तर तो, प्रत्येक शब्द. सत्य आहे, त्याचा प्रत्येक शब्द, प्रत्येक संज्ञा. आणि देवाच्या कृपेद्वारे, आपल्याला एकेदिवशी त्या देशात प्रवास करण्याचा अधिकार मिळाला आहे.

18 काल. लोकांना ठाऊक नाही की ह्या प्रकारच्या सेवकाईबरोबर उदासिनतेचा काळ आला आहे. मी खरोखर खिन्न झालो आहे, आणि मी पत्नीला म्हणालो, “मला वाटते मी पुढे जाऊ शकतो.”

ती म्हणाली, “बील, तू असे का म्हणतो?”

मी म्हणालो, “ओह, येथे माझ्याकडे संकटे आणि गोष्टी आहेत.”

19 आणि नंतर असे वाटले जणू काही पवित्र आत्मा बोलला, “तू त्यांना टाळण्याचा प्रयत्न करीत आहेस का? तू त्यांना उडविण्याचा प्रयत्न करीत आहेस काय?” पाहा?

20 “नाही”, मी म्हणालो, “मला त्या सर्वांच्या समोर उभे राहू दे आणि त्यांना तोंड देऊ दे. पाहा, थोडे...” समजले?

21 ते कितीतरी चांगले आहे. प्रामाणिकपणे, खरेच, हे मी साक्षीदारांसमोर सांगत आहे, हे जीवन संपले की लगेच, आपण त्या देशात प्रवेश करणार आहोत जे आपल्या विचारांच्या पलीकडे आहे. आणि जर तेथे कोणी अनोळखी आहेत, मी विश्वास करतो की तुम्ही नाही...मी देवाकडे प्रार्थना करतो. की तुम्ही मला धर्मांध समजू नका. माझी—माझी इच्छा आहे की जर कुठल्याही गोष्टीत, प्रामाणिक असावे आणि सत्यच सांगावे. आणि मला काय चांगले मिळेल की काहीतरी असे सांगावे जे चूकीचे होते, जेव्हा तेथे—तेथे एवढे काही आहे जे सत्य आहे? आपण, आपण त्याविषयी काहीही चुकीचे का सांगावे? पाहा? ते केवळ सत्य आहे.

22 आणि आश्चर्य करीत नाही, मी विश्वास करतो की पौलाला तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलून नेण्यात आले होते, आणि त्याने अशा गोष्टी पाहिल्या की माणसाने ज्यांचा उच्चारही करणे उचित नाही. आणि एके दिवशी तो बोलला, “डोळ्याने जे पाहिले नाही, कानाने

जे ऐकले नाही व माणसाच्या मनात, जे आले नाही, ते आपणांवर प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिध्द केले आहे."

23 ओह, आपण फक्त जगत आहोत...आपण येथे जगत आहोत कचऱ्याच्या ढिगावर, घाणीवर धुमसणाऱ्या अग्नीच्या धुरात. जरी आपणाला त्यापासून दुषित केले नाही, तरी आपण त्यांत राहात आहोत, जेथे कोळशासारखा धुर पापाच्या लाखेंतून येत आहे. एक सर्वात कंटाळवाणी गोष्ट ज्याचा विचार मी करु शकतो, त्या जून्या शहरात कचऱ्यांचा जळत असलेला ढिग. काय तुम्ही कधी त्याच्या जवळ गेला आहात? हा भयानक, धुराचा दुर्गंध सर्व प्रकारचा घाणीचा वास. आणि—आणि त्यामध्ये श्वास घेता, व त्यामुळे तुम्ही आपली तोंडे वळविता.

24 मला आठवण आहे न्यू अलबनीकडे जाताना...तेथे 18व्या गल्लीमध्ये, जेथे तो कचऱ्यांचा मोठा ढिग असे, आणि मला तेथे जाऊन मीटरची नोंद घ्यावी लागत असे. व एकत्र करुन आणावे लागत असे. त्या दिवसात मी घाबरत असे, त्या 18 व्या गल्लीमध्ये, जेव्हा तेथे त्या ठिकाणी मला नोंद घेण्यास खाली जावे लागत असे, कारण भयंकर दुर्गंधी येत होती. आणि तरीसुध्दा, तेथे मेलेले उंदीर व कुत्रे व इतर, तुम्हाला ठाऊक आहे, त्यामधुन तो धुर निघुन येत असे.

25 आता, तरी सुध्दा, जीवनाची तुलना, ही उत्तम जे आहे त्याच्या बरोबरच होते. त्या मंदावलेल्या आगीतून, जणू पापाची दुर्गंधी सर्वत्र पसरली होती, हे आत्मिक रितीने मी बोलत आहे. परंतु, हे, जेथे हवा मुक्तपणे वाहते व सगळे काही प्रेमळ, शांतीमय व आनंदी आणि अनंत जीवन, जे त्या नदीच्या पलीकडे. परंतु आम्ही एका युध्दभुमीवर आहोत, म्हणून त्या गोष्टी न सोडता म्हणावे "चला घाई करा व त्वरीत तेथे जाऊ या," आम्ही आमच्याबरोबर घेऊन यावे ज्यांना आम्हाला आणता येईल. होय.

26 आणि आता या धड्याचा उद्देश हाच आहे की जे भूमी ओलांडून पलिकडे आले आहेत त्यांनी आपला नांगर रोवून ठेवावा. ह्याचा उद्देश हा आहे की इफिसचे पुस्तकाचे अध्ययन करावे, ज्याद्वारे आम्हा मंडळीला ख्रिस्तामधील सुयोग्य स्थानी बसविते. यहोशवाचे पुस्तक व त्याने केलेली देशाची वाटणी, ही जुन्या करारात छायात्मकरित्या दर्शविलेली आहे. मागच्या रविवारी आम्ही पाहीले होते की, कशाप्रकारे यहोशवाने प्रत्येक व्यक्तिला त्या भुमीची वाटणी केली. आणि त्याने ते काम प्रेरित होऊन केले.

27 जसे मोशेने...मिसरांतून त्यांना बाहेर काढून आणले, तेथे लसूण, कांदा, यांतून बाहेर काढले, आणि देवाच्या अभिवचनानुसार जे चारशे वर्षांपर्यंत...किंवा चारशे वर्षांअगोदर त्याने आश्वासन दिले होते ते ठिकाण देईल, यासाठी की त्याने त्यांना त्या ठिकाणात आणावे, अशी भुमी जेथे दुधा-मधाचे प्रवाह वाहतात. आणि मोशेने इस्त्राएलांतील मुलांना त्या भुमीपर्यंत चालविले, परंतु तो त्यांना आत घेऊन जाऊ शकला नाही.

28 आणि येशू, त्यांना आध्यात्मिकतेमध्ये घेऊन गेला...आम्हाला ते आश्वासन पवित्र आत्म्यासंबंधी सुरुवातीलाच दिले आहे, येशू त्या अभिवचनापर्यंत घेऊन गेला. परंतु पवित्र आत्मा आला, यहोशवासारखा, जो आम्हाला पलिकडे घेऊन जातो यासाठी की आम्ही प्रत्यक्षात त्यात जाऊन त्या भूमीचा ताबा घ्यावा, किंवा मंडळीचा ताबा घ्यावा. आम्हाला हे, मुळत:, असे सापडते...

29 आता येथे जेथे, शक्यता आहे, की लोक विचार करु शकतात की मी उध्दट आहे व भावांची उपेक्षा करीत आहे. परंतु मी करीत नाही! देव माझा न्यायाधीश आहे, मी नाही. पाहा? मी फक्त एका मुद्द्याकडे जे सत्य आहे त्याकडे लक्ष वेधू इच्छितो. समजले? आम्ही मनुष्यांचे नेतृत्व, मनुष्य मार्गदर्शक, मनुष्याचे पुढारीपण हे पवित्र

आत्म्याच्या मार्गदर्शनाऐवजी निवडले आहे. आम्ही मनुष्यांची आवड धरली आहे की आम्हाला त्यातला भाग मिळावा आणि नेतृत्व करुन संप्रदाय करावा, जसे मेथॉडिस्ट, बॅप्टीस्ट, प्रेसबेटेरियन, लुथरन, चर्च ऑफ क्राईस्ट, पेंटेकॉस्टल, आणि अनेक संप्रदायिक मंडळ्या, ज्यांची एक संस्था आमच्यासाठी उदाहरण ठरेल, व आम्ही त्याला अनुसरत राहू. परंतु आम्ही...

30 परंतु बायबलमध्ये कोठेही असे आम्हाला करायचे नाही. तेथे पवित्र वचनाचा एकही विषय नाहीए, संपूर्ण बायबलमध्ये, जेथे देवाने कोणत्या मंडळीला संस्थेचे स्वरुप दिले आहे किंवा कोणत्या संस्थेबद्दल कधी बोलले आहे, कोणत्या एकाही स्थळी बायबलमध्ये आम्हाला संस्था सापडत नाही. परंतु वचन त्याच्या प्रत्यक्ष नेहमी विरोधात आहे. त्या देवाची इच्छा नाहीए की आम्ही जगाच्या लोकांसारखी पध्दत स्विकारावी. त्याला आम्ही असामान्य, वेगळे केलेले हवेत.

31 माझे असे म्हणणे नाही की "मुर्ख," बनावे, जसे आम्ही बोलतो. माझा अर्थ असा की बोलावलेले लोक, हो, जे आशीर्वादीत पवित्र राष्ट्र, ठपक्याविरहीत जीवन जगणारे, कृती करणारे, सद्वर्तन ठेवणारे जसे त्याची इच्छा आहे, त्या आमच्यामध्ये आपले कार्य करावे, कारण आम्ही त्याचे कामकरी आहोत, जे ख्रिस्तामध्ये येशूने चांगल्या कामांसाठी निर्माण केले आहेत.

32 आता, बुधवारच्या रात्री, तुमच्यातील पुष्कळ बुधवारी रात्री नव्हते, परंतु आम्ही त्यात गेलो...मला वाटते हे 3रे वचन किंवा...नाही, ते 5वे वचन आहे.

...*वारसासाठी*, किंवा लोकांची नेमणूक करावी...

33 परमेश्वर कसे, आपल्या लोकांना त्यांच्या स्थानी नेमत आहे. आणि जेव्हा एकाला देव नेमतो, तेव्हा, त्या संपूर्ण मंडळीला त्याच्यासारखे व्हावे असे वाटते, अशा प्रकारच्या गोष्टी असाव्या, तशाच गोष्टी कराव्या. आम्हाला वेगळ्याप्रकारे कापले गेले आहे, आम्ही विभिन्न बनलेले आहोत, आमचा स्वभावही विभिन्न बनविला गेला आहे, व नेमणूकही वेगवेगळ्या स्थळी झाली आहे, प्रत्येकजण वेगवेगळ्या कार्याकरिता नेमलेला आहे; काही जण थोड्याशा कामासाठी, तर काहीजण मोठ्या कामांसाठी. मला वाटते तो दाविद होता किंवा संदेष्ट्यांपैकी कोणी एक, मला आता आठवत नाहीए, तो म्हणाला, "मी...दुष्टाच्या घरात राहण्यापेक्षा देवाच्या घरातील द्वारपाळ बनून राहीन."

34 आता, एक सेकंद आम्ही थांबूया, दत्तकपणासाठी, 5वे वचन, त्या विषयावर येण्याचा मी प्रयत्न करीत आहे. परंतु आता येथे विषय लक्षात ठेवा एकंदरित नेमणूकीचा आहे. कितीजण हे समजत आहेत? एकाच शब्दात आम्ही म्हणताना ऐकू. नेमणूक [मंडळी म्हणते, "नेमणूक"—सम्पा.] शरीर ["ते शरीर."] येशू ख्रिस्ताचे ["येशू ख्रिस्ताचे."] त्या स्थळी ["त्या स्थळी."] ख्रिस्तामध्ये ["ख्रिस्तामध्ये."] जेथे पवित्र आत्मा ["जेथे पवित्र आत्मा"] आम्हास मार्गदर्शन करतो. ["आम्हास मार्गदर्शन करतो."] तेथे तुम्ही आहात, आता आम्हाला समजते, पाहा. उचित स्थळी नेमणूक करणे, इफिसच्या पुस्तकाला हे करायचे आहे.

35 आणि पौल जो एक शिक्षक, त्याच्याकडे ध्यान लावा. पहिली गोष्ट जी त्याने केली ती म्हणजे पतनाच्या सर्व कल्पना उडवून लावल्या. कोणत्याही विचारांना उडवून टाकले, "आज मी ख्रिस्ती या नात्याने आणि उद्या मी पतित झालो, व त्यानंतर देवाने मला दोषी ठरविले आणि पुन्हा त्या दिवशी मी परत वळलो." ही मूर्खता आहे! आता...हे पुस्तक सुवार्तिकाच्या शिक्षणासाठी नाहीए, सुवार्तिकाच्या उपदेशाचेही नाहीए. आम्ही नाही...मी कार्यक्षेत्रामध्ये या विषयावर बोलत नाही. मी हे मंडळीकडे आणतो, कारण पौलाने संत

जनांस संबोधन सांगितले आहे, ते जे बोलावलेले आहेत आणि जतन केलेले आहेत, आणि भरले गेले आहेत आणि वेगळे केले गेले आहेत, आणि ते पवित्र आत्म्यामध्ये आहेत, व कनानाच्या भूमीत पोहचलेले आहेत. पहिली गोष्ट, तो त्यांना हे सांगू इच्छित आहे, आपल्या मनातून ही गोष्ट काढून टाका की तुम्ही नष्ट होत चालले आहा आणि तुम्ही *हे* करायला जात आहा, व तुम्ही *ह्यासाठी* घाबरे झाला आहात. कोणत्याही गोष्टीमुळे घाबरे होऊ नका, कारण तो तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की तुम्ही कोठे आहात, तुम्ही कोण आहात, तुम्ही कसे उभे आहात.

36 आता, तुम्ही चुकीच्या गोष्टी करु शकता, आणि प्रत्येकवेळी जेव्हा तुम्ही चुकीचे कराल त्याचे प्रतिफळ भरुन द्यावे लागते. होय, महाशय, तुम्ही जे पेराल तेच कापाल! परंतु त्याचा तुमच्या तारणाशी काही संबंध नाही. जेव्हा तुम्ही देवाच्या आत्म्याने जन्म पावता, तेव्हा तुम्हाला सार्वकालिक जीवन लाभते आणि जसा परमेश्वर मृत्यु पावत नाही तसे तुम्हीही मृत्यु पावू शकत नाही. तुम्ही देवाचे भाग आहात, तुम्ही परमेश्वराचे पुत्र आहात.

37 मी ब्रॅन्हम म्हणून जन्मलो; तुम्ही मला कदाचित दुसरे नाव द्याल, काही दुसरे नाव, परंतु त्यामुळे माझे काही कमी होत नाही, मी तरीही ब्रॅन्हमच असेन. मी ब्रॅन्हम म्हणून जन्मलो, मी कायम ब्रॅन्हम म्हणून राहीन. मी...कदाचित मी पुढील दिवसात आकारहीन झालो, संधीवातामुळे झुकला गेलो, आणि नष्टप्राण होऊन प्राण्यासारखा दिसू लागलो, परंतु तरीही मी ब्रॅन्हमच राहीन! कारण? ब्रॅन्हम हे रक्त माझ्या नसांत आहे.

38 तसेच तुम्ही आहात. आणि जसे परमेश्वराने तुम्हाला बनविले आहे...आता स्मरण ठेवा, ख्रिस्ताच्या बाहेर आहेत, त्यांच्याशी मी बोलत नाहीए. मी त्यांच्याशी बोलत आहे जे ख्रिस्तामध्ये आहेत. तुम्ही ख्रिस्तामध्ये कसे येऊ शकता? “एका आत्म्याद्वारे!” मोठ्या अक्षरात S-p-i-r-...त्याचा अर्थ, “त्या एका पवित्र आत्म्याने आम्ही सर्व एका शरीरात बाप्तिस्मा पावलो.” आम्ही कसे...आम्ही कसे त्यामध्ये येतो? पाण्यातील बाप्तिस्म्याद्वारे? मी किती तुमच्याशी असहमत आहे बॅप्टीस्ट व तुम्ही चर्च ऑफ क्राईस्ट. पाण्याच्या बाप्तिस्म्याने नव्हे, कुठल्याही अर्थाने नाही! 1 करिंथ 12, म्हणते, “एका आत्म्याने, पवित्र आत्म्याने, आपण त्या शरीरात दाखल होतो.” आणि जसे ते शरीर, सुरक्षित आहे तसेच सुरक्षित राहतो. देवाने...तसे आश्वासन दिले आहे.

39 देव त्याच्यावर पुन्हा कसा न्याय आणिल, जेव्हा तो कलवरीवर गेला? गुलगाथावर गेला, त्याला हाणण्यात आले, व जखमा करण्यात आल्या, तो आरोग्य देऊ शकला नाही, त्याला एक शब्द ही बोलवेना. काय कारण असावे? त्याच्यावर जगाचे पाप लादण्यात आले होते. याचे कारण तो पापी होता असे नाही, परंतु “त्याला पाप करण्यात आले,” माझ्यासाठी व तुमच्यासाठी. जगाची पातके जी आदामापासून त्याच्या येण्यापर्यंतची, त्याच्या खांद्यावर लादण्यात आली. आणि देव काही आपल्या पुत्राला शासन करीत नव्हता. तर देव पापाला दंड देत होता. पाहा हे किती भयानक आहे? तो प्रायश्चित करीत होता. ज्यांना देवाने आपल्या पूर्वज्ञानाने जाणले होते, की ते येणार, त्यांना सोडविण्याचा मार्ग तो करीत होता. आपण काही क्षणात तिकडे जाणार आहोत.

40 आता, जेव्हा तुम्ही, “एका आत्म्याने त्या शरीरात बाप्तिस्मा पावला, एका शरीरात, जो ख्रिस्त आहे,” आणि आम्ही नेहमी सुरक्षित आहोत.

41 आता, येथेच ही गोष्ट आम्हाला अपरिचित जाणवते, विशेषतः अरमेनियम विश्वासी बाबत, ते लोक...ज्यांना काही करायचे आहे एका विशिष्ट कक्षेपर्यंत आणावे, किंवा असेच काही. ह्या दोन्हीही गोष्टी एकाचवेळी कशा होतील? हे कार्य एकतर कृपेद्वारे किंवा कर्माद्वारे.

ते त्याचप्रकारे नसेल, ते विभिन्न दोन वेगळ्या गोष्टीद्वारे आहे; परंतु ते एकापासून असणे गरजेचे आहे. ते…

42 मी, माझे सांगतो, देवाची कृपा सोडून दुसरे काही पाहत नाही. ही माझी समज आहे. मी कायम कृपेवर विश्वास केला आहे. मी संपूर्णतः कृपेमध्ये आहे; बस हीच गोष्ट आहे. मी—मी…मी मुलगा होतो, तेव्हा माझ्या जीवनात मी कृपेशिवाय काहीही पाहिले नाही, फक्त कृपा, कृपा. ते म्हणाले. “मी—मी…तुमची पाठ खाजविन आणि तुम्ही माझी पाठ खाजवा.” हे मी विचित्र पध्दतीने व्यक्त करित आहे. परंतु मी याची काळजी करित नाही की तुम्ही माझी पाठ खाजविता की नाही, जर तुम्हाला गरज आहे, काहीही असो मी खाजविन. पाहा, कृपा. हो, महाशय. पाहा, कृपा ही प्रेमाने कार्य करते. जर तुम्हाला त्याची गरज आहे! याची पर्वा न करता जरी तुम्ही माझ्यासाठी काही केले नाही, मला—मला त्यांजशी काही कर्तव्य नाही, जर तुम्हाला गरज आहे तर मी ते कसेही असो करीनच. कृपा! कारण तीच तुम्हाला हवीय!

43 मला तारणाची गरज होती. कोणी मला उध्दार देऊ शकत नव्हता. मी माझ्यासाठी काहीही करु शकत नव्हतो, मी स्वतःही मला वाचवू शकत नव्हतो. परंतु मला तारणाची गरज होती, कारण मी एका परमेश्वरावर विश्वास केला होता. आणि देवाने आपला पुत्र पाठविला, पापमय शरीराच्या प्रतिरुपाने बनविलेल्या शरीरात, त्याने माझ्या बदल्यात शिक्षा भोगावी, आणि माझे तारण व्हावे, फक्त कृपेनेच मी तारण पावलो. स्वत:ला तारण देण्यासाठी एकही गोष्टी तुम्ही, आणि मी करु शकत नाही. आणि त्याने ज्यांना पूर्व ज्ञानाने ओळखले होते जगाच्या स्थापने अगोदर…

44 गेल्या बुधवारी, ही गोष्ट पाहिली. आम्ही देवाचे चित्रण असे केले होते की, एला, एलोहीम, आणि हे दाखविले की तो स्वतःमध्ये अस्तित्वात असणारा देव आहे. परंतु त्याच्यामध्ये पितृत्व होते, त्यांच्यामध्ये काही विशेष गुणवत्ता असणारे गुणधर्म होते, जसे तारणहारा, जसे आरोग्यदेणारा. हे सर्व परमेश्वरामध्ये होते, व तो स्वत:च अस्तित्वात होता. परंतु एक तारणारा ह्या नात्याने, एक पितृत्व…जेव्हा त्याच्याकडे स्वर्गदूतही नव्हते, त्याच्याकडे तेव्हा काही नव्हते. तेव्हा काही नव्हते फक्त देव स्वतः होता. तो स्वत: अस्तित्वात असणारा होता. देवाशिवाय काहीच अस्तित्वात नव्हते.

45 परंतु तो त्या कारणासाठी देव होता, मग कोणीतरी असणे गरजेचे आहे जो त्याची भक्ती करील, कारण त्याला भक्ती आवडते. आणि त्याने स्वत: प्राणीमात्र निर्माण केले जे त्याची उपासना करतील. आता क्षणभरासाठी, पुन्हा आपण ते पाहू. क्षणभरासाठी, संपूर्ण विषयात आपण जाणार नाही, परंतु तुम्हाला ते ध्वनीमुद्रण म्हणजे टेप वर मिळेल. परंतु तो देव असल्यामुळे, त्याने स्वर्गदूतांना बनविले, आणि दूतांनी त्याची उपासना केली. ते स्वर्गदूत आजही देवाची उपासना करीत आहेत. का, ते स्वर्गदूत देवाच्या समक्षतेत उभे राहतात, त्यांना सहा पंखाचा संच, सहा पंख आहेत. ते दोन पंख आपल्या चेहऱ्यावर ठेवतात, दोन पंख आपल्या पायांवर ठेवतात, व दोहोंनी देवाच्या उपस्थितीत उडतात, व रात्रं-दिवस मोठ्याने बोलतात, “पवित्र, पवित्र, पवित्र प्रभू देव सर्वशक्तिमान.” हेच पवित्र-शास्त्र म्हणते. त्यांनी त्याची उपासना केली, आता त्यांना बनविले की त्यांनी देवाची उपासना करावी.

46 नंतर त्यामध्ये तारणाऱ्याचे गुणधर्म होते. त्या निर्मिलेल्या दूतांपैकी कोणावरही पाप नव्हते किंवा पापांचा विचारसुध्दा नव्हता. तर मग त्यांच्यातील कोण कसा नाश पावेल? नाश होऊच शकत नाही. म्हणून असे काही बनवावे जे हरवले जाईल जेणेकरुन तो तारणारा बनू शकेल. त्याच्यामध्ये रोग बरे करण्याचे गुणधर्म होते. काय तुम्ही विश्वास

करता की तो तारणारा आहे? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] तुम्ही विश्वास करता का तो रोग बरे करणारा आहे? [“आमेन.”] परंतु काय होईल जर तारणासाठी व रोग बरे करण्यासाठी कोणीच नाहीए? पाहा; तेथे काहीतरी तसे बनले जाणे गरजेचे होते.

47 म्हणून, त्याने तशाप्रकारे बनविले नाही, परंतु त्याने मनुष्याला व्यक्ती स्वातंत्र्य असलेला बनविले, “जर तु हे घेतले तर जिवंत राहशील व जर तु *ते* घेतले तर मरण पावशील.” आणि प्रत्येक मनुष्य जो या जगात येतो तो अशाच संचात बनविलेला आहे. देवाला, त्याच्या पूर्वज्ञानाने, हे माहीत होते कोण असेल आणि कोण नसणार. जर देव…

48 एका दैवज्ञानी अभ्यासकाने काल मला प्रश्न विचारला, जो प्रार्थना सभेला उपस्थित होता किंवा त्याने ध्वनीमुद्रकावर ऐकले, म्हणाला “एक प्रश्न आहे!” तो म्हणाला, मग, त्याने म्हटले, “काय देव सर्वव्यापी आहे काय? मग,” तो म्हणाला, “तो सगळीकडे उपस्थित असतो?”

49 मी म्हणालो, “तो जसे वचन बोलतो तसा तो सर्वव्यापी नाही. तो एक व्यक्ती म्हणून सर्वव्यापी नाहीए. जर तो सर्वव्यापी आहे, तर का तुम्ही पवित्र आत्म्यासाठी प्रार्थना करता? जर तो सर्वव्यापी आहे, तर त्याने तडा, कोपरे, भेग, प्रत्येक पेशी, तंतूमय पदार्थ यांना व सर्वांनाच व्यापून टाकील.” मी म्हटले, “का त्याने मोशेचा शोध केला, जर तो सर्वव्यापी आहे, तर त्या खानावळीत का शोध केला? जर तो सर्वव्यापी आहे तर का त्याने एदेन बागेत ‘आदामा, आदामा तू कोठे आहेस?’ असे का पुकारून त्याने शोधा-शोध केली?”

50 तो सर्वज्ञानी असल्यामुळे सर्वव्यापी आहे. त्याला सर्वकाही ठाऊक आहे कारण तो अनंत आहे, त्याच्या त्या अनंतपणामुळे तो सर्वव्यापी आहे. तो सर्वव्यापी असल्यामुळे, अनंत आहे, नंतर, तो स्वर्गात बसतो. तो एक व्यक्ती असल्यामुळे तो एका ठिकाणात राहतो.

51 परंतु, अनंत असल्यामुळे, त्याला सर्वज्ञात आहे. प्रत्येक वेळेला क्षुल्लकपण त्रासदायक बाब याबद्दल तो आपले डोळे मिचकवितो. प्रत्येक मधमाशी त्याला माहीत आहे, कोठून ती मधाच्या पोळ्यातील कप्प्यात जमा करते. तो प्रत्येक चिमणीला ओळखतो जी झाडावर बसते. तो आपल्या मनातल्या प्रत्येक विचारांना ओळखतो, कारण तो अनंत आहे व सर्वव्यापी आहे. हे आहे, तो फक्त अनंतच नाही, सर्वव्यापी आहे, त्याला सर्व माहीत आहे. परंतु तो एक व्यक्ती आहे, देव एक व्यक्ती आहे, आणि त्याच्या या व्यक्तीतून हे बाहेर येऊ लागले.

52 आणि पाप, मी एके रात्री बोललो होतो, की पाप ही निर्मिती नाही. पूर्णतेशिवाय काही निर्मिती केली नाही. देवाने सर्व गोष्टी चांगल्या निर्माण केल्या. पाप हे निर्मिती नाहीये. मी म्हणालो, “छान, हीच तर पापाची निर्मिती आहे.” तुम्ही हे ऐकले आहे. परंतु ते चुकीचे आहे. पाप…निर्माणकर्ता एकच आहे, आणि तो देव आहे. देव पापाची निर्मिती करु शकत नाही, कारण तो पवित्र असून त्याच्यामध्ये असे काही नाही की तो हे बनविल. पाप ही विकृती आहे; निर्मिती नाही, परंतु विकृती आहे. व्यभिचार हा नीतिमत्वाची विकृती आहे. लबाडी हे सत्य चुकीने सांगणे होय. कोणतेही पाप, कोणतेही पाप हे नीतिमत्वाची विकृती आहे.

53 म्हणून आता, देवाने सिध्द केले. त्याने स्वत:ला प्रगट केले, तो देव आहे. त्याने स्वत:ला तारणारा म्हणून प्रगट केले; मनुष्य पतीत होऊन भटकला होता आणि त्याला त्याने वाचवले. त्याने स्वत:ला आरोग्य देणारा म्हणून प्रगट केले. यात काहीच फरक पडत नाही की लोक काय म्हणतात की तो आहे; आणि तो आहे. काही का असेना, तो सारखाच आहे. तो आरोग्य देणारा आहे, तो तारणारा आहे, तो देव आहे. तो सार्वकालिक

आहे. आणि त्याचा एक उद्देश आहे. प्रारंभीच, त्याचा उद्देश हा होता, की निर्मिती करावी जी देवावर प्रेम करील व त्याची आराधना करील.

54 आणि त्याने प्राणिमात्र उत्पन्न केले, आणि ते पतीत झाले, आणि मग देवाने, त्याच्या अनंतातून, खाली पाहीले वेळेच्या प्रवाहात व त्याला मनुष्य दिसले जे प्रत्येक तारले जातील. प्रत्येक मनुष्य, त्याला हे आपल्या पुर्व...पूर्वज्ञानाने माहित होते. म्हणून जर त्याने, आपल्या पूर्व ज्ञानाने, हे जाणले की कोण तारण पावेल आणि कोण तारण पावणार नाही, तो हे पूर्वीच नेमू शकतो. म्हणून, काही झाले तरी शब्द हा तसा वाईट शब्द नाहीए, नाही का? तो पूर्वनियोजन करु शकतो कारण तो जाणतो कोणाला तो पत्करणार व कोणाला नाही. म्हणून, त्यांना वाचवावे म्हणून, त्यांच्यासाठी त्याला प्रायश्चित करायचे होते. हो, जर आम्ही तेथे लक्ष लावू, आम्ही त्यामध्ये जाऊ इच्छितो, काही खालील वचने. त्याने आम्हाला पूर्वनियोजित असे सार्वकालिक जीवनासाठी ठरविले, हे जाणून की ते सर्व बाजूला सारुन आणि जगाच्या मुलांना ते कितीही वेगळे वाटो काही हरकत नाही, त्यांच्यासाठी ते महत्त्वाचे नाही, कारण ते देवाची मुले होते. आणि त्याने त्यांना पाचारण केले आहे.

55 आणि त्याने येशूला पाठविले, यासाठी की त्याचे रक्त ही आमची भरपाई असावी, रक्ताद्वारे प्रायश्चित, प्रायश्चित करावे, किंवा स्विकारणे किंवा शुध्द करावे. शुध्दतेची प्रक्रिया कायम करावी...एकेवेळी आलेल्या संजीवनातच नव्हे, परंतु "जिवंत राहून आम्हासाठी मध्यस्थी करावी." यासाठी की ख्रिस्ती हे रात्र व दिवस शुध्द राखले जावेत. तेथे ते रक्त आहे जे प्रभू येशू ख्रिस्ताचे जे त्या क्रुसांवर स्विकारले गेले, देवाच्या उपस्थितीत, जे आम्हाला सर्व पापांपासून शुध्द करते, रात्र आणि दिवस. आणि आम्ही सुरक्षितरित्या दुमडले जातो. कसे दुमडले जातो? पवित्र आत्म्याद्वारे प्रभू येशूच्या शरीरात व सुरक्षित. "जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे." त्याच्यावर न्यायाची वेळ येत नाही! एक ख्रिस्ती कधीही न्यायात जाणार नाही. ख्रिस्त त्याच्यासाठी गेला. माझा वकिल माझ्या पक्षात उभा राहीला. त्याने माझी बाजू मांडली, यासाठी की मला त्यांतून वगळावे. त्याने पित्याला सांगितले की मी काही लायक नाही, म्हणून मला वगळले. परंतु त्याने माझ्यावर प्रेम केले आणि माझी जागा घेतली, आणि माझ्या बाजूने आर्जव केले, आणि आज मी स्वतंत्र आहे! होय, महाशय. आणि त्याने त्याचे रक्त सांडले, आमच्या पातकांसाठी देऊन टाकले.

56 आठवण करा गेल्या बुधवारी रात्री, कोणताही ख्रिस्ती...ख्रिस्ती व्यक्ति पाप करतो, परंतु एक पापी पाप करीत नाही. एक पापी पाप नाही करित, कारण तो पापी आहे. तो एक पापी सुरुवातीपासूनच तसा आहे आणि म्हणून ते तसे आहे. येथे, ह्या पुस्तकाचा पाठिमागचा भाग, तो काळा आहे, त्याचा किती भाग काळा आहे? सर्वच. त्यात काही सफेद नाहीए, परंतु काळा आहे. तुम्ही म्हणता, "*हा* एवढासा भाग." नाही, तो नाहीए, ते संपूर्ण काळे आहे. ते संपूर्ण काळे आहे. त्याचप्रमाणे एक पापी व्यक्ती असतो. त्याची सुरुवातच दोषी म्हणून होते. ठिक आहे, तुम्ही म्हणाल, "त्याने व्यभिचार केला तर त्याबद्दल काय? त्याचे काय जर त्याने स्त्रीवर बलात्कार केला तर? त्याचे काय जर तो जूगार खेळतो? त्याचे काय जर त्याने बंदुकीतून कुणावर गोळ्या झाडल्या?" ते आमचे काम नाही. ते आमचे काम नाहीये, आमच्याकडे त्याच्यासाठी नियमावली आहे जी त्याची काळजी घेते. आम्ही सुधारणुक घडवून आणणारे नाहीत, आम्ही शुभवर्तमानाचे प्रचारक आहोत. आम्ही त्याला दंड ठरवू शकत नाही त्याच्या कार्यामुळे, आम्ही त्याला व्यभिचाराच्या कृत्यांबद्दल दोष देत नाही. आम्ही त्याला दोष देतो या कारणासाठी की तो पापी आहे! जर तो एक

ख्रिस्ती असता तर, त्याने ते कृत्य केले नसते. हे बरोबर आहे. जर तो बदलला गेला आहे, तर तो असे करणारच नाही. परंतु तो पापी असल्यामुळे त्याला ते करावयास प्रवृत्त करते.

57 येथेच त्या नियमावलीने चालणारा मनुष्यांच्या अधिन रंगभूमीवरुन हे ठोठावले जाते. होय, महाशय, भावा, मला हे तूला सांगू दे, "हे कर्मांनी नाही, परंतु कृपेने आम्ही वाचलो, आणि ते विश्वासाद्वारे." होय, महाशय. आता, मी नियमावळीत भावांना दोष देत नाहीए, ते माझे भाऊ आहेत. आणि ते ही तेथे असतील, जसे बाकीचे हे असतील, कारण देवाने त्याच्या मंडळीला तसे असावे म्हणून पूर्वीच ठरवून ठेवले आहे. परंतु एक गोष्ट मात्र आहे, तुम्ही लोकांना असे फाडता, की त्यांना समजत नाही. "आज, होय, मी—मी जरी..." त्यांना हे जाणू द्या; त्यांना जर जगाची एवढी भूक आहे, तर ते तेथले सुरुवातीपासूनच नाहीयेत.

58 मी माझ्या बायकोबरोबर विश्वासयुक्त राहत नाही कारण मला वाटते ती मला सूटपत्र देईल. मी माझ्या बायकोबरोबर प्रेम करतो म्हणून मी विश्वासयुक्त राहतो. ही एक कायद्याची अवस्था आहे जी आम्ही पत्करली आहे, की आम्ही एकमेकांवर प्रेम करावे. पहिली गोष्ट, ते असण्याअगोदर प्रेम असणे गरजेचे आहे. मी तिच्यावर प्रेम करतो. माझा विश्वास आहे जरी मी काही चुकीचे केले, तरी ती मला क्षमा करिल, तरीदेखील, तशी चूक मी करणार नाही. मी तिच्यावर प्रेम करतो.

59 त्याच्याप्रमाणे हे ख्रिस्ताबरोबर आहे. जर मी—जर मी जगलो...मी आता पन्नास झालो, व जर मी नव्वद किंवा शंभरपर्यंत जगलो, तर मला अजून पन्नास वर्षे प्रचार करण्यासाठी मिळतात; आणि जर मी प्रचार ही केला नाही त्यावेळी, तरी नदी किनारी बसेन. कारण मी तारण पावलो आहे. देवाने त्याच्या कृपेद्वारे मला वाचविले, काम नसलेले असे काहीही जे मी कधी करीन किंवा केले, किंवा असे काही. मी प्रचार करतो कारण मी त्याच्यावर प्रेम करतो आणि मी त्याच्या लोकांवर प्रेम करतो. आणि याच कारणांकरिता मला माहित आहे की मी मरणांतून जीवनात पार गेलो आहे, कारण मी त्याच्यावर प्रेम करतो व त्यासाठी त्याच्या मागेही जातो. कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीत ते का असेना, मी त्यांच्या मागे काहीही झाले तरी जातो. जा आणि त्यांना मिळवा कसेही करुन, त्यांना ओढुन काढा. जर सेवक जन असहमत असतील, आणि इतर असहमत असतील, संप्रदायिक मंडळ्या असहमत असतील, ते मला थांबवू शकत नाहीत. कारण काहीतरी आहे! ते त्याला थांबवू शकले नाहीत! तो त्या अविश्वासाच्या स्थितीमध्ये उतरला, आणि त्याला कोणी थांबविले नाही, तो कसेही करुन पुढे गेला. तेच आम्हीही करितो, बाहेर जाऊन त्यांना मिळवितो, त्यांना धरतो काहीही करुन. काहीही का असेना, पोहचा, बळकवा, पकडून ठेवा जेवढे तुम्हाला करता येईल. तुम्हाला माहीत नाही ते कोण आहेत. त्यांना वाचवा प्रेमाच्या कारणामुळे. "हे मला करणे भाग आहे," म्हणून नव्हे, परंतु मी प्रेम करतो म्हणून, कारण तुम्ही प्रेम करता.

60 तुम्ही म्हणाल, "मला तेथे जाऊन त्या बाईबरोबर सलोखा केला पाहीजे, परंतु, मी म्हणतो आताच जा, मला वाटते मी पहिला चर्चला जातो नंतर ते मी करीन." नाही, पहिले तुम्हाला त्यासाठी ते योग्य करावे लागेल. पाहा? समजले? जर तुमच्या हृदयात देवाचे प्रेम नाही, काहीतरी दुसरेच तुम्हाला अशी समज देतील की तुम्ही चुकीचे आहा, तेव्हा तुम्ही जा—तुम्ही जा व देवाबरोबर सलोखा करा. मग तुम्ही तुमच्या शेजाऱ्यांबरोबर सलोखा करा.

61 येशूने हीच गोष्ट शिकविली. तो म्हणाला, "जर तुम्ही वेदीजवळ आलात, आणि… तुम्हाला आठवले की तुमचे शेजाऱ्यांविरुध्द किंवा भावांविरुध्द काही आहे, जा व पहिल्याने, त्याच्याबरोबर सलोखा करा."

62 आता, आता जी युगे जी येणार आहेत. गेल्या बुधवारी रात्रीचा विषय, "प्रगट होणे." याबद्दल. आम्ही पुन्हा तो आजच्या सकाळी पाहुया, या विषयांमध्ये की "देवाच्या पुत्रांचे प्रगट होणे." दुसऱ्या शब्दात, देव वाट पाहत आहे. आणि अंतिम समयी जेव्हा आम्ही त्याच्यासमोर उभे असू. स्वर्गदूतांचा नाश होणार नाही. त्यांना हे माहीत नाहीए जे आम्हाला माहीत आहे, की आर्शीवादाचा आस्वाद कसा लुटावा, ते कधीही गमावले गेले नाहीत. परंतु मला हे माहित आहे की मी कुठून आलो, एक पापी, जो त्या खडकांतून कापण्यात आला. तुम्ही जाणता की तुम्ही कुठून खोदून काढलेले आहांत. आता जेव्हा आम्ही सापडलो आहोत, तर आम्ही देवासमोर उभे राहू शकतो. ओह, काय अद्भूत दिवस तो असेल!

63 मग दत्तकपणा, नेमणूक होईल. आता, देव त्या कार्यामध्ये कार्यरत आहे. आणि जर आता मी ते तुमच्याकडे घेऊन आलोय, तर आपण त्याला आताच सुरुवात करुन पाहूया, पाचवे वचन, मला वाचावयाचे आहे. इफिस 1:5

*त्याने आपल्या मनाच्या* सत्संकल्पाप्रमाणे *आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते,*

64 हा देवाचा आनंद आहे कि त्याच्या सत्संकल्पाप्रमाणे करावे, दत्तकपणा व नेमणूक करावी. आता तो काय करीत आहे? त्याच्या मंडळीची नेमणूक करीत आहे. पहिलं, त्याने त्याच्या मंडळीला पाचारण केले, मॅथोडिस्ट, प्रेस्बेटेरियन, लुथरन, बॅप्टिस्ट, यांना पाचारण केले. त्यानंतर त्याने काय केले? पवित्र आत्मा पाठवून त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा दिला.

65 माझी अशी इच्छा आहे की तुम्ही पेंटेकॉस्टल लोकांनी हे तुमच्या हृदयातून काढून टाकावे. पेंटेकॉस्ट हा काही संप्रदाय नाहीये; परंतु पेंटेकॉस्ट हा एक अनुभव आहे. तो पवित्र आत्मा आहे. ते काही संस्था नाही. तुम्ही पवित्र आत्म्याला संस्थेचे स्वरुप देऊ शकत नाहीत. आणि तो त्यासाठी उभाही राहणार नाही. आता, तुम्ही ज्याला संस्था म्हणून पुकारता, परंतु पवित्र आत्मा बाहेर निघून जातो आणि तुम्हाला तुमच्या जागी ठेवतो आणि तसेच चालू राहू देतो. पाहा? पेंटेकॉस्ट ही काही संस्था नाहीए; पेंटेकॉस्ट हा एक अनुभव आहे.

66 आणि नंतर देव आपल्या लेकरांना नविन जन्म देतो, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे. ते जवळ येतात आणि जेव्हा ते स्वत:ला स्वच्छ करतात नॅझरिन, पिलिग्रिम होलिनेस. त्यानंतर ते पेंटेकॉस्टच्या अनुभवात येतात, किंवा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, वरदानाचा जीर्णोद्धार. ते भिन्न–भिन्न भाषा बोलत गेले आणि अन्य भाषेचा अनुवाद केला गेला, आणि मिळालेल्या आरोग्य आणि चमत्कारांचे दान, आणि चिन्हे व अद्भूते यांची सोबत त्यांना लाभली. आता ते मुले आहेत, ते देवाची मुले आहेत. ते ख्रिस्तामध्ये आपले स्थान मिळविलेले आहेत. ते जन्माद्वारे मुले ठरले. आणि नविन जन्म आणि स्वतःतील बदल हा पवित्र आत्म्याला दर्शवितो.

67 तुम्ही पवित्र आत्मा मिळवेपर्यंत बदलत नाहीत. हेच पवित्र शास्त्र सांगते. येशूने पेत्राला सांगितले, कोणालाही विचारा, तुमच्या शास्त्रात वाचा, तो प्रभू येशूवरील विश्वासाद्वारे न्यायी ठरला गेला होता, व अनुयायी बनुन, तो प्रेषित बनला. येशूने त्याला स्वर्ग राज्याच्या किल्ल्या दिल्या. आणि योहान 17:17, त्याने त्यांना पवित्र केले, आणि त्यांना सामर्थ्य

दिले, बाहेर पाठविले, भुतांना घालविले आणि अनेक गोष्टी केल्या. त्यांना पवित्र केले. “हे पित्या, तू त्यांना तुझ्या सत्याने, पवित्र कर, तुझे वचन हेच सत्य आहे. मी त्यांच्यासाठी स्वत:ला पवित्र करतो.”

68 ते सर्वात मधुर असे शब्द जे मी कधी ऐकले असतील. “पित्या, मी त्यांच्यासाठी स्वत:ला समर्पित करतो.” तुम्ही हे जाणता काय की त्याला हा हक्क होता की स्वतःचे घर असावे? तो एक मानव होता. तुम्ही जाणता की एक पत्नी असावी असा अधिकारही त्याला का होता? तो एक मानव होता. त्याला या सर्वांवर अधिकार होता, परंतु तो म्हणाला “पित्या, मी स्वत:ला त्यांच्यासाठी सत्यात समर्पित करतो. यासाठी की त्यांनीही सत्यात समर्पित व्हावे.”

69 मी एका प्रचारकाबरोबर बोलत होतो, मी त्यांच्यासाठी काही रात्री या महामार्गावर प्रचार करणार आहे. आणि मी त्याला काही गोष्ट विचारली. तो म्हणाला, “होय, भाऊ ब्रॅन्हम, परंतु माझे पुष्कळ लोक त्यावर विश्वास करित नाहीत.”

मी म्हणालो, “पुष्कळजण काय नियमावलीने चालणारे व्यक्ती आहेत?”

70 “होय.” भाऊ त्यावर विश्वास करीत नाही. “परंतु,” त्याने म्हटले, “त्यांच्यासाठी!” ओह, मला जणू त्याच्या गळ्याला मिठी मारावी असे वाटले. “त्यांच्यासाठी, पाहा, मी स्वत:ला सत्यात समर्पित करीत आहे.”

71 हो, येशू बाराही व्यक्तींना प्रशिक्षण देत होता, कारण या बारा व्यक्तीद्वारे शुभवर्तमान हे जगात जावे. आणि तो म्हणाला, “त्यांच्यासाठी मी स्वत:ला समर्पित करतो.” तुमच्या स्वत:स शेजाऱ्यांसाठी पवित्र करा, इतर कोणासाठी तरी पवित्र करा. “तुमच्या स्वतंत्रतेचा उपयोग देहवासना तृप्त करण्यासाठी करु नका,” असे संत पौलाने म्हटले आहे, “परंतु स्वत:ला पवित्र करा!” शेजाऱ्या पाजाऱ्यांत आपले वर्तन चोख ठेवा, जसे एका खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला केले पाहीजे तुमचे बोलणेही, जर तुम्ही तुमच्या शत्रूस भेटला, त्याच्यासाठी स्वत:ला पवित्र करा, तुम्ही काय करु शकाल हे तुम्हाला माहीत नाही.

72 आता पुत्रांची पुर्नस्थापनेबद्दल, पहिली गोष्ट जेव्हा पूत्र येतो, पुत्र बनतो, परंतु आम्हाला त्याच्या वर्तनावरुन समजते की तो दत्तकपणासाठी पात्र आहे किंवा नाही, तो वर्तन कसे करतो चांगले किंवा वाईट.

73 आणि आता पेन्टेकॉस्टल...आता मला तुम्हाला दाखवू द्या की पेन्टेकॉस्ट हा संप्रदाय नाही. येथे किती बॅप्टीस्ट, बाप्तिस्मा पावलेले आहेत, त्यांनी पवित्र आत्मा स्विकारला आहे, तुमचे हात मला दाखवा. पाहा? किती मेथॉडिस्ट येथे आहेत ज्यांनी पवित्र आत्मा स्विकारला, तुम्ही आपले हात वर करा. किती नॅझरिन्स येथे आहेत ज्यांनी पवित्र आत्मा स्विकारलेला आहे, तुम्ही आपले हात उंच करा. प्रेसबेटेरियन पवित्र आत्मा स्विकारला आहे काय? पाहा? लुथरन? दुसरे सांप्रदायिक मंडळ्या, ज्या पेन्टेकॉस्टला धरुन नाही येत, परंतु दुसऱ्या सांप्रदायिक मंडळ्यांना धरुन आहेत, पवित्र आत्मा तुम्हाला मिळाला आहे तर आपले हात दाखवा. पाहा? म्हणून पेन्टेकॉस्ट हा संप्रदाय नाहीए, हा एक अनुभव आहे.

74 आता, देवाने तुम्हाला ख्रिस्ताच्या शरिरात घेतले. आता तो काय करतो? तुम्ही हे स्वतःहून सिध्द केले की स्वत:चे पवित्रीकरण झाले हे तुमच्या उत्तम आचरणाद्वारे, पवित्र आत्म्याचा आज्ञाधारकपणा, जग काय म्हणते त्याजशी काही कर्तव्य नाही.

75 मी—मी हा विषय अधिक तीव्र रितीने मांडणार आहे, पाहा, कारण...मला उध्दट रितीने बोलायचे नाही...मला तसे बोलायचे नाही, पाहा. मला असे वाटतही नाहीए,

माझे—माझे म्हणणे. मला—मला तसे बोलायचे नाही. लोकांना जमा करा आणि देवाने पाठविलेले सत्य त्यांना प्रचार करा, आणि ते तर त्यापासून परावृत्त होऊन पुन्हा तीच कृत्ये करत राहतात, आणि म्हणतात मला पवित्र आत्मा मिळाला आहे. ह्या गोष्टींनी मी थकतो. या गोष्टी तुमची जवळजवळ नासाडी करतात, पाहा. काय चालले आहे? ते परत आपल्याच गोष्टींकडे फिरतात, जसे इस्त्राएलांच्या मुलांनी केले, त्यांना एक राजा हवा होता जो त्यांच्यावर धनीपण करील आणि त्यांना अमोरी, अमालेकी आणि पलिष्ठियाच्यासारखे करण्यास भाग पाडील.

76 महिलांनो, तुम्ही हे जाणता काय? की घट्ट विजार परिधान करणे चुकीचे आहे? तुम्ही हे जाणता काय? तुम्ही हे जाणता काय केसांची बटा कापणे हे चुकीचे आहे? श्रीमान तुम्हाला हे माहीत आहे का धुम्रपान करणे व इतर अशाच कृती चुकीचे आहे? तुम्हाला हे चुकीचे माहीत आहे काय की तुम्ही आपल्या घराचे पती नसावे, तुमच्या पत्नीचा संताप वाढतो व लाथ मारुन दरवाज्या बाहेर काढते आणि तुम्ही म्हणता, “होय प्रिये, तुझे हृदय आशीर्वादित होवो, मी परत येऊ का?” तुम्हाला माहीत आहे...तुम्ही देवाच्या घरात कसे नाजूक राहाल जर तुमचा तुमच्या घरावर योग्य ताबा नाही? हे एकदम खरे आहे. बहिणींनो, तुम्हाला हे माहीत आहे काय की तुमचा पती हा केवळ तुमचा पती नसून तो तुमच्यावर स्वामीत्व करणारा आहे? देवाने हे म्हटले आहे. कारण हेच की पती हा भुलविला गेला नाही, तर स्त्री भुलविली गेली. आणि तुम्ही प्रचारक, स्त्रीयांना तुमच्या मंडळ्यात पाळक व प्रचारक बनविणे चालू ठेवले आहे, हे जाणून ही की देवाचे वचन त्यासंबंधी दोष देते.

77 तुम्ही हे नाव बाप्तिस्म्यांसाठी कायम वापराल “पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा”, परंतु त्याचा पवित्र शास्त्रात एक कण सुध्दा सापडत नाही. मला आर्चबिशप किंवा कोणीही मला दाखवावे की बायबलमध्ये कोणाचा तरी बाप्तिस्मा हा “पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या” नावाने झाला. मला असा कोणी व्यक्ति हवाय जो मला दाखवू शकतो की येशू ख्रिस्ताच्या नावाचा बाप्तिस्मा सोडून दुसरा कोणता बाप्तिस्मा झालाय. परंतु योहानाचा बाप्तिस्मा... नव्हता, त्यांनी बाप्तिस्मा घेतला व जो येणार त्याजवर विश्वास ठेवला, परंतु ते त्याला ओळखत नव्हते की तो कोण आहे. परंतु जेव्हा त्यांनी त्याला ओळखले, त्यांना परत येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्यावा लागला. मला असा कोणी व्यक्ती हवा आहे...मी—मी अंसेम्बली ऑफ गॉड यांना विचारले, दुसरे प्रचारक, बॅप्टिस्ट, प्रेसबेटेरियन आणि सगळेच. ते त्याबद्दल बोलणार नाहीत. मला वचन पाहायचे आहे.

78 आणि मग मी एक “धर्मवेडा,” हा, नंतर “एक मुर्ख,” डोके फिरलेला, मी एक “वेडा मनुष्य,” कारण मी तुम्हास सत्य सांगण्याचा प्रयत्न करित असल्यामुळे? आता, माझ्या भावांनो, हे खरे आहे. जर मनुष्य देवासाठी संपूर्णपणे विकला गेला, तुम्ही बंदुकीचा चाप, बंदुक, आणि बंदुकीची नळी विकली तुम्ही—तुम्ही—तुम्ही—तुम्ही—तुम्ही वेगळे केले गेलात, तुम्ही—तुम्ही वेगळेच प्राणी आहात.

79 पुष्कळजण बोलावलेले आहेत, थोडेच निवडलेले आहेत. होय, पुष्कळ लोकांस पाचारण झालेले आहे, तुम्हाला तुमच्या हृदयात ते पाचारण मिळाले, “होय, मी विश्वास करतो देव माझ्यावर प्रेम करतो. मी विश्वास करतो की तो प्रेम करतो.”

80 परंतु, भावा, तुम्ही त्यांच्यासारखे जिथपर्यंत नाश पावलेले व्हाल, कारण ते त्यादिवशी येतील व म्हणतील, “प्रभू, मी तुझ्या नावाने भुते घालविली. मी तुझ्या नावाने सर्वकाही केले. मी आरोग्यवरदानाची सेवा केली. मी शुभवर्तमानाचा प्रचार केला. मी भूतांना काढले.”

81 आणि येशूने म्हटले, “माझ्यापासून चालते व्हा, मी तुम्हाला ओळखत देखिल नाही, ढोंग्यांनो. तो जो माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो!” लोक हे का पाहत नाहीयेत? आता, मला ठाऊक आहे ही गोष्ट तुम्हाला लागते. आणि माझी—माझी इच्छा नाही की तुम्हाला दुखवावे, माझा त्याप्रमाणे अर्थ नाहीए. परंतु, भावा, मी...मी...

82 माझ्याकडे पाहा, आपण अंत समयात आलो आहोत, आणि देव दत्तकपणा देत आहे, मंडळीमध्ये आमच्या जागा आम्हाला नेमून देत आहे, ख्रिस्ताच्या शरीरात, त्याच्या शरीरात. आता, त्यामध्ये फार लोक जाणार नाहीत, मी अगोदरच तुम्हाला हे सांगु इच्छित आहे. तुम्ही म्हणाल, “हो, फार चांगले आहे, एवढी मोठी संख्या आहे!” परंतु त्याच्याकडे सहा हजार वर्षे होते ज्यांतून त्याने त्यांना खेचून बाहेर काढले आहे. आठवण ठेवा, पुनरुत्थान येईल आणि आम्ही त्यांच्याबरोबर उचलले जाऊ. त्यांतले थोडेसे, पाहा. तुम्ही तुमचे तारण साधून घ्या, लवकरच. स्वतःकडे पाहा आणि जाणा काय माझे चुकले आहे. पाहा? काय आहे ही बाब, मला माहित आहे ही—ही गोष्ट कठिण आहे, परंतु, भावा, हे खरे आहे. हे देवाचे सत्य आहे. दत्तकपणा!

83 आम्ही देवासाठी पेटून उठलो पाहीजे, आम्ही दिवस आणि रात्र गेलो पाहिजे. आम्हाला कोणी रोखू शकत नाही, आणि आम्ही इतके गोड व आनंददायी असायला हवे, आणि इतके दयाळू आणि आमच्या जीवनात ख्रिस्तासारखे असायला हवे. ते जीवनात प्रत्येक दिवशी केले पाहीजे. येशूने म्हटले, “तुम्ही रानांतील फुले पाहा, ती कशी वाढतात, ती कष्ट करीत नाहीत व सुत कातीत नाहीत, तरी मी तुम्हास सांगतो, शलमोन देखील आपल्या सर्व वैभवात त्यांतल्या एकासारिखा सजला नव्हता.” शलमोनाकडे रेशीम सुईकाम केलेले फार सुंदर झगे होते, परंतु येशू त्याबद्दल बोलत नव्हता. त्या फुलांना वाढण्यासाठी, रात्रं-दिवस मेहनत करावी लागे. तुम्ही या अंताच्या टोकाला कशासाठी परत आला आहात? जर न्यायी मोठ्या मुश्कीलीने वाचले जातात, तर पाप्यांना कोठे जागा मिळेल (ते अविश्वासी लोक आहेत) आणि अभक्तीने वागणारी, मनुष्य जो वचन ऐकतो व त्यात चालण्यास नकार देतो? आता आम्ही काय करणार आहोत? पाहा? आता ते...

84 ही, आता, आपली मंडळी आहे. आम्हांमध्ये चार किंवा पाच अपरिचित व्यक्ति आहेत. परंतु ही मंडळी आहे, येथे मी तुम्हांस शिकवित आहे. हे ध्वनीमुद्रण जाईल, माझी इच्छा आहे जे लोक हे ध्वनीमुद्रण ऐकतील त्यांनी आठवण ठेवा, हे मी माझ्या मंडळीला म्हटले आहे. लोकांमध्ये बाहेर असताना, त्यांना याबद्दल सांगतात सौम्यतेने सांगण्याचा प्रयत्न करा. बाळकांबरोबर त्यांच्याशी अशाप्रकारे राहा जेथे त्यांच्या कल्पना दुध मलई पुरता आहेत. परंतु जेव्हा त्यांचा सत्याचा पाया घालण्याची वेळ येते, तेव्हा ते करा.

85 दत्तकपणा, योग्य जागी नेमणूक करणे! ते कोठे आहेत? मला दाखवा ते कोठे आहेत. देव आपल्या लेकरांना प्रकटीकरणाद्वारे पाचारण करुन वेगळे काढून ठेवतो. त्यांना त्याबद्दल एक शब्दही बोलण्याची गरज नाहीए. तुम्ही पाहा काहीतरी घडते. मुलाची योग्य जागी नेमणूक करण्यात येते, त्याला त्याचपद्धतीप्रमाणे व्यवस्थेप्रमाणे करण्यात येते. तो—तो जेवढे अधिकार पाहिजे त्यात येतो, त्याचे शब्द हे आद्य देवदूताच्या शब्दांएवढे चांगले ठरतात, किंबहुना अधिक. पुत्राला दत्तकपणा मिळाला, त्याला मोठे उंच स्थान मिळाले, तेथे बसविण्यात आले, त्याचा झगा बदलला गेला, त्याचे रंगरुप पालटले. पित्याने त्यासाठी एक पवित्र विधी केला, म्हणाला, “हा माझा पुत्र आहे, या क्षणापासून याच्या खांद्यावर सत्ता राहील. तो अधिकारी आहे. माझ्या सर्व वतनांवर तो आहे. माझ्या मालकीचे जे आहे ते त्याचे आहे.” हे बरोबर आहे. नंतर आम्ही जर मागे गेलो, एला, एला, एलोहिम, एलोहिम, पाहा? जेथे तो स्वतः अस्तित्वात असणारा. आणि नंतर तो

यहोवा बनला, ज्याने काही बनविले, त्याने मनुष्याला पृथ्वीवर धनीपण दिले. आम्ही कशासाठी थांबलो आहोत? प्रगट होण्याची वाट पाहत अहोत. पृथ्वी ही कण्हत आहे. आपण जाऊन वाचूया. ठिक आहे.

> *...आगाऊच नेमले...मुलांना वारसा हक्क देण्यासाठी...* त्याच्या *इच्छेच्या सत्संकल्पाप्रमाणे,*
>
> *त्याच्या...त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी.*

86 त्याची कृपा काय आहे? मागे गेलो तर, जेव्हा तो पिता नव्हता; त्याची कृपा, त्याचे प्रेम, यांद्वारे त्याने स्वतःस पुत्र बनविले, ज्याद्वारे पूर्वनियोजनाद्वारे आम्ही देवाच्या पूत्राचा दत्तकपणा मिळवावा, त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी. पाहा?

> *...त्याच्यामध्ये त्याने आम्हास स्विकारले, ख्रिस्त जो प्रियकर (असा व्यक्ति).*

87 त्याने स्विकारावे असे कसे केले? त्याच्याद्वारे. त्याच्यामध्ये आम्ही कसे जातो? एका आत्म्याद्वारे, सर्व त्याच्याठायी बाप्तिस्मा पावले आहेत. ऐका.

> *त्यांच्या रक्ताच्याद्वारे खंडणी भरुन मिळविलेली मुक्ती म्हणजे आपल्या अपराधांची* (एस–आय–एन–एस) *क्षमा ...*

88 पापासाठी कोठेतरी प्रायश्चित असल्याशिवाय, तितपर्यंत तुम्ही पूर्वनियुक्तीचा, देवाच्या पूर्वनियुक्तीच्या व्यवस्थेचा प्रचार कसे करु शकता? असे का? प्रत्येक दिवशी तुम्ही चुक करत असता, प्रत्येक दिवस तुम्ही चुक करता. परंतु जर तुम्ही नविन जन्म प्राप्त केलेले पुरुष किंवा स्त्री आहात, चुक घडताच, देव हे जाणतो की आम्ही त्याबद्दल क्षमा मागतो. तुम्ही जर अध्यक्ष रुसोवेल्ट किंवा अजून कोणी व्यक्तीच्या उपस्थितीत असाल आणि म्हणाल “मी चुकलो आहे, देवा मला माफ कर याविषयी.” का? आणि तेथेच कोठे रक्त प्रायश्चित...

89 तुम्ही लक्ष द्या. “s–i–n–s” म्हणजे पापे. एक पापी हा पापीच आहे, तो पाप करीत नाही. परंतु मंडळी ही पाप करते, चुका करते, चुकीचा विचार आणते, अयोग्य प्रभाव, अडचण, अयोग्य चाल जसे एक लहान मुल अनिश्चितरित्या चालते तसे, चालावे कसे हे शिकण्याचा प्रयत्न करते. त्याला अजून माहित नाही. कसे योग्य चालावे, कारण ते लहान मूल आहे. परंतु आमच्याकडे हात आहे जो सहज त्याच्याकडे पोहचतो तो जर...पकडला तर तो डगमगणार नाही, आणि म्हणेल, “मुला, *असे* चाल.” तो आम्हाला उचलून धरित नाही आणि धापट ही मारित नाही कारण आम्ही चुका केल्या आहेत, तो आम्हाला असा तडाखा देत नाही की आम्ही मरुन जाऊ कारण आम्ही चालण्यास शिकत आहोत. तो आम्हावर प्रेम करतो जसे आपण आपल्या मुलांवर प्रेम करतो.

90 एक, खरा वडील आपल्या मुलासाठी चाबूक दाखवत नाही जेव्हा तो मुलगा चालण्याचा प्रयत्न करत आहे, जर का तो भूमीवर पडला तो लगेच पोहचून आपल्या मजबूत हाताने त्याला उचलतो, तुम्हाला दोन्ही हातांनी पकडून ठेवतो, म्हणतो, “मुला, अशाप्रकारे कर. *असे* चाल.”

91 त्याचप्रमाणे देव त्याच्या मंडळीशी वागतो! तो लगेच त्या ठिकाणी पोहचतो व आपल्या बाहूमध्ये पकडतो, वर उचलतो व म्हणतो, “मुला, *असे* चाल. येथे, असे बोलु नको—नको, *अशाप्रकारे* बोल. आता, मी काळजी करीत नाही की मंडळी काय म्हणते, *हा* काय म्हणतो, *तो* काय म्हणतो; तू *अशाप्रकारे* बोल. जसे हे, आहे. जर माझे वचन असे प्रचार करते, त्याच्याशी एकनिष्ठ राहा, त्याबरोबर चाला. त्याच्याबरोबर राहा. ह्याची काळजी

करु नका की सगळे जण काय म्हणतील, त्या वचनाबरोबर राहा. *असे* चाला. हा तो मार्ग आहे ज्यामध्ये आपली पावले उचला."

92 आमच्या पापांसाठी; आमच्या पापांसाठी प्रेमाने प्रायश्चित केले, नाहीतर आम्हाला कधी संधी मिळाली नसती. आम्ही कशाप्रकारे या वचनांमध्ये आमची पकड ठेवली पाहीजे!

*...त्याच्या कृपेच्या अपार समृध्दीने;*

*त्याने—त्याने विपुलतेने केली आहे...*

93 "विपुलता," म्हणजे काय? हो, देवा! कोठे त्याने *विपुलता* केली आहे, "मोठ्या राशी केल्या आहेत."

...त्याने *सर्व ज्ञान व बुध्दी ह्यांच्यासह त्याने ही कृपा* आपल्यावर *विपुलतेने केले आहे;*

94 "दुरदर्शित्व, सर्व ज्ञान यांची विपुलता त्याने केली." सर्व "ज्ञानाने," हे जगाचे ज्ञान नव्हे. कारण या जगाचे ज्ञान देवापुढे मुर्खता आहे, आणि देवाचे ज्ञान ही जगासाठी मुर्खता आहे. जसे दिवस व रात्र, एकमेकांबरोबर सहमत होत नाहीत. परंतु जेव्हा सुर्योदयास सुरुवात होते आणि दिवस उगवतो, रात्र निघून जाते सर्व ठिकाणांतून. आणि जेव्हा शुभवर्तमानाचा प्रकाश पडण्यास सुरुवात होते, त्यावेळी जगाच्या सर्व गोष्टी हळूहळू दिसेनाशा होतात. आणि ते काय करते? तो सुर्यप्रकाश आपल्या लेकरांवर विपुल देतो, आत्म्यात चालण्यास, देवाच्या आत्म्याचे मार्गदर्शन लाभले, त्याच्या कृपेची अपार समृध्दी, सर्व बुध्दी आणि ज्ञान, समज आणि चातुर्य ते यासाठी की कसे चालावे हे कळावे. तुम्ही पाहा जर चुकीचे आहे, तर तुम्ही सावध असा जे काही तुम्ही करणार... जर ते चुक आहे, तर सावधान असा कशाप्रकारे तुम्ही हाताळत आहात. शहाणे! जवळ असा, व खात्रीपूर्वक जवळ जाऊन हाताळा. सापासारखे चतुर असा, परंतु कबुतरासारखे निरुपद्रवी असा. हेच येशूने सांगितले.

95 हो, मित्रांनो, हे सोन्याचे गोळे आहे. आम्ही त्यावर दिवसेंदिवस राहू शकतो. ते खरचं अद्भूत नाहीये काय? हुशारी, ज्ञान यांची विपुलता त्याने आम्हावर ओतली आहे! त्याने ती चमचाभर नव्हे, तर मोठ्या आकाराच्या साधनाद्वारे तो ते ओतत आहे. विपुलता आम्हासाठी केली, ज्ञानाने व सर्व शहाणपणाने त्याची कृपा करण्यात आली! हो, आश्चर्य कारक कृपा, किती मनोरम अशी भासते!

आता, *सर्व ज्ञान व बुध्दी ह्यांच्यासह त्याने ही कृपा* आपल्यावर विपुलतेने *केली आहे.*

*त्याने स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले...*

96 तो कोणाशी बोलत आहे? संप्रदायांशी? कृपया, माझ्या भावांनो, मी तुमच्या संप्रदायाला हिणवतो आहे असे समजू नका. मी तसे करीत नाहीए. मी हे सांगण्याचा प्रयत्न करतोय की, सुरुवात अयोग्य रितीने झाली आहे. येशूने म्हटले, "जा आणि सुवार्तेचा प्रचार करा," आम्ही गेलो आणि संप्रदाय बनविले. त्याच कारणांमुळे आम्हाला ते प्राप्त होऊ शकले नाहीत, आम्ही मनुष्यांच्या ज्ञानाला अनुसरुन चालत आहोत. जर कॅलविन उद्भवला तर!

97 का, फार काळ झाला नाही मी एका महान मनुष्यांच्या कबरेजवळ उभा राहिलो होतो. तो महान सुधारक होता. आणि मी विचार करित होतो, किती महान हा व्यक्ति होता! ...तो जॉन वेस्ली होता. आणि मी विचार केला, जॉन वेस्ली जर आज उठला आपल्या कबरेतून

आणि त्याने आपल्या मंडळीची अवस्था पाहिली तर त्याला लाज वाटेल आपल्या नावाची. जॉन वेस्ली हा एक देवाचा मनुष्य होता, एक कोलीत हिसकावलेला, असे त्याने म्हटले आहे. जॉन वेस्ली हा पवित्र पुरुष होता जो देवावर विश्वास करणारा होता, आणि त्याच्या मागे पावलांवर पाऊल ठेवून अनुसरत होता. परंतु जॉन मरण पावल्यावर, ते म्हणाले, "जॉनसाठी आपण एक चर्च उभारु, मग आमचे एक चर्च होईल, आणि त्याला आम्ही मेथॉडिस्ट चर्च संबोधू, कारण त्याच्या पवित्रीकरणाची जी कार्यपध्दत आहे ही कृपेचे दुसरे कार्य आहे."

98 त्यानंतर त्यांनी एक चर्च उभारले, आणि आज त्या चर्चमधील व्यक्ती सर्व गोष्टी नाकारतात ज्यासाठी जॉन वेस्ली उभा राहिला होता. जॉन वेस्ली यांनी दैवी आरोग्याविषयी प्रचार केला होता. जॉन वेस्ली हे आत्म्याच्या बाप्तिस्म्यावर विश्वास करणारे होते. जॉन वेस्ली हे संपूर्ण वरदानांच्या परत मिळण्यावर विश्वास करणारे होते. जॉन वेस्ली, मार्टिन लुथर यांपैकी महान व्यक्तीनी अनन्य भाषा बोलून त्याचा अनुवाद केला आहे, आणि आज जर तुम्ही मेथॉडिस्ट व लुथरन चर्चमध्ये अनन्य भाषेत बोलाल तर ते तुम्हाला लाथ मारुन दरवाज्याबाहेर घालवतील. काय झाले आहे? पुत्रांची नेमणुक करण्याची वेळ येऊन पोहचली आहे व हे काय चाललय? त्यांनी दुसऱ्याच गोष्टी अवलंबल्या आहेत, कारण त्यांना देवाचे रहस्य माहीत नाहीये. आणि त्यांना ते कधीही सेमेनरीद्वारे समजावयाचे नाही!

99 मला तुमच्यापुढे काही वाचू द्या. मी वाचले तर चालेल काय? ठीक आहे. आपण वळू या, माझ्याकडे येथे काही लिहिलेले आहे. आपण शोधू या पौलाने...आता, येथे ह्या संदेशाचा तो शिक्षक आहे. आपण जाऊ या प्रेषित कृत्ये 9:5, एक मिनिट थांबा. हे ऐका, पौलाला हे प्रकटीकरण कसे प्राप्त झाले, जे काही घडले. आता, प्रेषित कृत्ये 9 मध्ये आपण वाचण्यास सुरुवात करु या, यासारखे. हा संडेस्कुल वर्ग आहे, तर आपण का ते वाचू नये? मला हे कळवा मी जर ओळीबाहेर जात असेन...?...

> *आणि शौल अजूनही प्रभूच्या शिष्यांना धमक्या देणे...* (हो, आकड्यासारखे नाक व फार तापट, म्हणजे यहुदी!) *...व त्यांचा* घात *करणे याविषयीचे फुत्कार टाकीत होता,*
>
> *त्याने प्रमुख याजकाकडे जाऊन त्याच्यापासून दिमिष्कांतल्या* सभास्थानांना *अशी पत्रे मागितली की तो मार्ग अनुसरणारे कोणीही त्याला आढळल्यास...*

100 "मी जाईन व पाहिन! मुला, मला जर ते सापडले तर मी काय करतो ते बघा! पाहा, मला ते जर सापडले!" परंतु तो तर पूर्वनियोजित होता!

101 तुम्हाला हे कसे समजणार की तो दारुडा जो तेथे आहे हा जीवनासाठी पूर्वनियोजीत नाहीए? तुम्हाला हे कसे समजणार की ते जे रस्त्यावर चालत आहेत, ज्यांच्याशी तुम्ही बोलतही नाही, तुम्हाला हे कसे समजू शकेल की त्यांना एक हात मिळवल्याने व चर्चला बोलावल्याने तिचा पालट देवाचे संतजनात नाही का होणार. ते तिला पलिकडे गौरवात घेऊन जाईल? कधी...तुम्हाला हे कसे समजेल की ती त्यासाठी नाहीए? तेच तुम्ही आम्ही जाणू शकत नाही. परंतु हे आमचे कर्तव्य आहे. जसा एखादा कोळी जाळे समुद्रामध्ये टाकतो व खेचतो, त्याला त्यामध्ये बेडूक, माशे, पाली, समुद्र कोळी आणि असे अनेक प्रकार सापडतात, परंतु त्यांच्यापैकी काही माशे असतात. त्याला हे माहीत नसते, तो फक्त जाळे टाकतो. तेच आम्ही करीत असतो. पौलाकडे पाहा.

*...त्याची इच्छा होती की दिमिष्कांतल्या सभास्थानांना अशी पत्रे मागितली की, तो मार्ग अनुसरणारे पुरुष किंवा स्त्रिया कोणीही त्याला आढळल्यास त्याने त्यांना* यरुशलेमेस आणावे. (भावा, तो फार उग्र होता.)

*आणि जाता जाता असे झाले की तो दिमिष्काजवळ येऊन पोहचला: त्यावेळी अकस्मात त्याच्या* सभोवती *आकाशातून प्रकाश चमकला...*

102 तेथे एक धर्मगुरु त्याला रस्त्यावर भेटला, डॉ. एफ.एफ.जोन्स् आणि त्याला म्हणाला "मुला, तुला एक—एक सेमेनरीचा अनुभव आता हवा, आणि मला विश्वास आहे की देव तुझा वापर करु शकतो?" त्याप्रकारे वाचल्याने हे भयंकर दिसणारे वचन नाही का वाटत, आता, त्यातून योग्य समज मिळते...मी हे विनोदासाठी नाही म्हणत आहे. त्याची आम्हाला योग्य समज त्यांतून आज घ्यायची आहे. "तुम्हाला माहीत आहे, तुमची आई ही चांगली स्त्री होती, माझा विश्वास आहे की तू एक चांगला प्रचारक होशील." काय झाले पाहा.

*मग—मग जाता जाता असे झाले की तो दिमिष्काजवळ येऊन पोहचला त्यावेळी अकस्मात त्याच्या* सभोवती *आकाशांतून प्रकाश चमकला* (काय म्हणता? हे तर दैवी होते) *प्रकाश आकाशांतून चमकला.*

*तेव्हा तो जमिनीवर पडला आणि* त्याने *अशी वाणी आपणाबरोबर बोलताना ऐकली की, शौला, शौला माझा छळ का करितोस?*

*तेव्हा तो म्हणाला प्रभो, तू कोण आहेस?* त्याने म्हटले, *ज्या येशूचा तू छळ करितोस तोच मी आहे. पराणीवर लाथ मारणे तुला कठीण आहे.*

*आणि तो* कापला *आणि आश्चर्य चकित* झाला आणि *म्हणाला, प्रभू मी... काय करावे? प्रभू म्हणाला, तर उठ व नगरात जा, म्हणजे तू काय* करावयाचे *हे तुला सांगण्यात येईल.*

103 आणि ती मनुष्ये त्याच्याबरोबर प्रवास करीत गेली, ती पुढे जाता जाता त्यांना एक मनुष्य आढळला. हनन्याने तर एक दृष्टांत पाहिला होता. सर्व एकदम अद्भूत व दैवी! आणि तो जुना शौल, माझे म्हणणे तो जुना मनुष्य! ह्या हनन्याने एक दृष्टांत आपल्या घरी पाहिला! तो एक संदेष्टा होता, व आपल्या घरी प्रार्थना करीत होता आणि त्याला दृष्टांत झाला. तो...प्रभू त्याच्याशी बोलून म्हणाला, "पलीकडचा एक मनुष्य तुझ्याकडे येत आहे, तो वटवाघळाप्रमाणे आंधळा आहे, आणि त्याचे नाव शौल आहे, तो तार्सकर शौल आहे."

104 तो म्हणाला, "प्रभू, मी पुष्कळ मोठ्या गोष्टी ऐकल्या आहेत. मला नको पाठवू, मी एक लहान मनुष्य आहे, त्याच्यामागे मला पाठवू नको."

105 तो म्हणाला, "परंतु, पाहा, त्याच्या रस्त्यात, मी त्याला दृष्टान्त दाखविला आहे, मी स्वतः त्याला अग्नीस्तंभात प्रगट झालो आहे. मी त्याला एकदम आंधळे करुन सोडले आहे. आणि मला त्याला आंधळे करुन तुकडे करावे लागतील, जर मला त्यांच्यातून काही बाहेर आणायचे आहे. पाहा, मला त्याच्या दैवीज्ञानाचा अभ्यास करावा लागेल. तुम्ही जाणता, तो—तो—तो एक महान व्यक्ती त्या मंडळ्यात होता. त्याच्याकडे सर्व प्रकारच्या डिग्र्या होत्या, देवाला त्याला उजाळा आणायचा नव्हता," परंतु, तो म्हणाला, "मला आता काय केले पाहीजे तर जे आहे सर्व ते त्याच्यातून काढुन टाकायचे."

106 हीच ती गोष्ट होती त्याला ते त्याच्यात जास्त ठेवायचे नव्हते, परंतु सगळे त्याच्यातून काढायचे होते. मला वाटते, हिच ती गोष्ट आजच्या पुष्कळ धर्मगुरुबाबत आहे. ते बाहेर

काढायचे आहे, जेथे देव त्याच्यामध्ये पवित्र आत्मा घालील. बाहेर काढा! तेथे तो म्हणाला…

107 आणि तो म्हणाला, “प्रभू, परंतु हा—हा—हा मनुष्य फार भयंकर आहे.”

108 तो म्हणाला, “परंतु तो प्रार्थना करित आहे. आता, तू एका रस्त्यावर जाशिल आणि तुला एक पाण्याचा झरा लागेल. तो झरा ओलांडून पुढे जा, डावीकडे, आणि तू खाली जा. तेथे एक पांढरे घर असेल, वर जा आणि दरवाजा ठोठाव. तो तेथेच दिवाणखान्यात पडून आहे, तेथे तो तुला सापडेल तुझे हात त्याच्यावर ठेव, दिमिष्काची नदीकडे खाली त्याला घेऊन जा आणि येशुच्या नावाने बाप्तिस्मा दे. कारण, मी तुला सांगतो मी काय करणार आहे, माझ्यासाठी त्याला फार काही भोगावे लागणार आहे, कारण तो माझा परराष्ट्रीयांसाठी संदेशवाहक असणार आहे.” आमेन!

109 “आता, ठीक आहे, एक मिनिट थांब, प्रभू! आता, कोणती शाळा मी त्याला सुचवू?” मी तुम्हाला सांगतो, आता काय करावे? आता वाचा गलतीकरास पत्र आणि शोधा. पुढच्या—पुढच्या अध्यायात लगेच पाहुया. गलतीकरास पत्र 1ला अध्याय शोधा, आणि 10 व्या वचनापासून वाचूया, आणि हे शोधूया की पौल कोणत्या शाळेत गेला होता, कोणत्या सेमेनरीमध्ये गेला होता, आणि त्याच्यावर कोणी हात ठेवले होते, आणि, ओह, ज्या गोष्टी घडल्या. गलतीकरास पत्र 1ला अध्याय. वेळ वाचवण्यासाठी, सुरुवात करुया त्याचा झालेला बदल, 10वे वचन.

> *मी आता मनुष्याची की देवाची मनधरणी करावयास पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करावयास पाहत आहे काय? मी अजूनपर्यंत मनुष्यांना* संतुष्ट *करीत राहीलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास* नसतो.

110 ओह पाहा. या अगोदर मला येथे थोडेसे सांगू द्या. गलतीकरास पत्र 1,8वा अध्याय काढू या. किती जणांना हे माहीत आहे की पौलानेच त्या लोकांचा पुन्हा बाप्तिस्मा येशूच्या नावाने केला, प्रेषित कृत्ये 19? होय त्याने खचित केला. त्याच्यावरचे वचन आता पाहूया, 8वे—8वे वचन.

> *…परंतु जी सुवार्ता आम्ही तुम्हाला सांगितली तिच्याहून निराळी सुवार्ता आम्ही सांगितली, किंवा स्वर्गातून आलेल्या देवदूताने सांगितली, तरी तो शापभ्रष्ट असो.*

111 पौला, तुला ही सुवार्ता कुठे मिळाली? 9वे वचन

> *…आम्ही अगोदर सांगितले तसे मी आताही पुन्हा सांगतो की* जी तुम्ही स्विकारली *तिच्याहून निराळी सुवार्ता कोणी तुम्हास सांगितल्यास तो शापभ्रष्ट असो.*

112 जर तो एक आद्य देवदूत आहे, जर तो एक अध्यक्ष आहे, जर तो एक पर्यवेक्षक आहे, जर तो एक डॉक्टर *अमुक-अमुक* आहे, तो कोणही असो, तो जर प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाचा पाण्यातील बाप्तिस्मा प्रचार करीत नसेल, आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, आणि दाने वरदाने यांच्या पुनः उभारण्यावर प्रचार करीत नसेल, ख्रिस्ताचे येणे, आणि यासारख्या गोष्टी, तर तो शापित असो. जर तो प्रयत्न ही करील की या वचनांतून काहीतरी काढावे आणि म्हणावे हे तर दुसऱ्या युगासाठी होते, आणि ते वचन तो कल्पित गोष्टींकडे जुळविल ज्या काही सेमेनरिमधून शिकलोय तर तो शापित होवो!

113 पुढे वाचूया, पाहा, पौलाला हे कसे मिळाले, पाहा कसे, मी आज सकाळी काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

*मी आता मनुष्याची की देवाची मनधरणी करावयास पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करावयास पाहत आहे? मी अजूनपर्यंत मनुष्यांना संतुष्ट करीत राहिलो असतो* तर मी *ख्रिस्ताचा दास नसतो.*

114 मी कशी अपेक्षा करु शकतो, एक व्यक्ती, एक प्रचारक कसा देवावर प्रेम करु शकतो, विशेष करुन काही करण्याची अपेक्षा तो बाळगतो, परंतु मनुष्यांकडून नाकारला जातो? मनुष्ये तुमचा तिरस्कार करतील. ठीक आहे, ते म्हणाले येशूने म्हटले, "जर त्यांनी मला घराचा मालक म्हटले...मी गुरु आहे, तुमच्यामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. मी असा आहे जो खूप अद्भूते करितो आणि पवित्र आत्म्याने खूप काही तुमच्याहून अधिक करतो, कारण माझ्यामध्ये पूर्णता आहे. आणि जर त्यांनी मला 'बालजबुब' म्हटले, ते तुम्हाला किती अधिक म्हणतील? परंतु," म्हणाले, "तुम्ही काही विचारात ठरवू नका, काय बोलावे म्हणून, कारण बोलणारे तुम्ही नाही तर पिता आहे जो तुमच्यामध्ये राहतो, तो तुमच्यासाठी बोलेल. वचनाबरोबर योग्य राहा." आणि तो, जेव्हा त्याने पुस्तक लिहणे समाप्त केले, तो म्हणाला, "जर कोणी मनुष्य या पुस्तकातील एक शब्ददेखिल काढिल किंवा त्या शब्दांत भर घालील, त्याचे नाव जीवनाच्या पुस्तकातून खोडून टाकले जाईल." देव आम्हाला सहाय्य करो, त्याच्याशी एकनिष्ठ राहण्यासाठी.

115 आता, पुढचे वचन, मला वाचू द्या, लवकर वाचू या.

*मी तुम्हास हे...कळवितो की, मी सांगितलेली सुवार्ता मनुष्यांच्या सांगण्याप्रमाणे नव्हे, ती तुम्हाला न्यायात घेऊन जाते.*

आता, मी मेथॉडीस्ट, बॅप्टीस्ट, प्रेस्बेटेरियन, किंवा पेन्टेकॉस्टल ही नाहीए, कारण ते मनुष्यांच्या सांगण्याप्रमाणे नाहीए...

*कारण ती मला मनुष्यांपासून प्राप्त झाली नाही, आणि ती मला कोणी शिकविली ही नाही...*

116 "मला ती मनुष्यांपासून मिळालेली नाही, नाही सेमेनरीतून, ना ही कोणी डॉक्टरकडून, कोणा दैवी अभ्यासकापासून ही नाही, शिक्षण देणाऱ्या शाळेतून ही नाही. ती त्या पध्दतीने मिळाली नाही, मी त्याप्रकारे शिकविली ही नाही, मला ती त्या पध्दतीने सापडली नाही, ती माझ्याकडे कधीच त्या मार्गाने आली नाही." पौला, मग ती तुझ्याकडे कशाप्रकारे आली?

*...शिकविली, परंतु येशू ख्रिस्ताच्या प्रकटीकरणाने ती मला प्राप्त झाली.*

117 "जेव्हा ख्रिस्ताने ती मला प्रकट केली, की तो देवाचा पुत्र आहे, त्या दिवशी तो अग्नीचा स्तंभ माझ्यावर उतरला, मी म्हणालो, 'प्रभू तू कोण आहेस?' तो म्हणाला, 'मी येशू आहे.'"

118 आता, मी तुम्हाला हे दाखवू इच्छित आहे की, त्याला काय झाले. आता, जर कोणा व्यक्तिला काही अनुभव आहे, ते त्याला 10 वर्षे देऊ इच्छितात ग्रीक शिकण्यासाठी, आणि अजून 10वर्षे दुसरे काही शिकण्यासाठी, आणि त्यावेळेत तो निघून गेला. पाहा.

*...कारण ती मला मनुष्यांपासून प्राप्त झाली नाही, आणि ती मला कोणी शिकविलीही नाही, तर येशू ख्रिस्ताच्या प्रकटीकरणाने ती मला प्राप्त झाली*

यहुदी *धर्मातल्या माझ्या* पूर्वीच्या *वर्तणुकीविषयी तुम्ही* ऐकले *आहे की...*

119 "मुला, मी एक मोठा डॉक्टर पदवी घेतलेला होतो." त्याला गमेलियलच्या अधिन शिक्षण मिळाले होते, त्या काळचा, त्या देशातील उच्च शिक्षक होता. किती जणांना हे माहित आहे की गमेलियल हा त्याच्यापैकी एक महान, फार महान गुरु होता? होय, श्रीमान.

"माझ्या यहुदी धर्मात, मुला, माझ्याकडे होती. मला सर्व माहीत आहे कशी प्रेषितांचा विश्वास अंगिकार प्रार्थना म्हणावी आणि इतर सर्व गोष्टी ज्या तुम्ही पाहता. मला माहित आहे. सर्व सकाळची प्रार्थना आणि लोकांना आशिर्वाद देताना कसे बोलावे." पाहा?

> *...मी कसा देवाच्या मंडळीचा पराकाष्ठेचा छळ करीत असे व तिचा नाश करीत असे. मी कसे;* त्या लोळणाऱ्या ख्रिस्ती समुहाला कितीदा अडविण्याचा प्रयत्न केला. पाहा? पाहा?
>
> *आणि माझ्या* यहुदी *धर्मात* मी *पुढे गेलो होतो...*

120 "मी एक महान मनुष्य होतो, मुला, मी खरोखर...मी फार पुढे गेलो होतो, मी त्यांना मारुन खाली पाडिन, कारण स्तेफनाला मी मारले आणि अजून पुष्कळ गोष्टी मी केल्या. पाहा मी कसे केले!" कसा त्याने पराकाष्ठेचा छळ केला!

> *आणि माझ्या* पूर्वजांच्या संप्रदायाविषयी *मी विषेश आवेशी असल्यामुळे माझ्या लोकांतल्या माझ्या* वयाच्या *पुष्कळ जणांपेक्षा* यहुदी *धर्मात* मी *पुढे गेलो होतो.*

121 आता, आठवण ठेवा, देवाच्या वचनांसाठी नाही, "पूर्वजांच्या संप्रदायाविषयी," चर्चच्या परंपरा, दुसऱ्या शब्दांत. "मला वाटते मी मेथॉडिस्टमध्ये मुरलेलो होतो, मी बॅप्टीस्टमध्ये मुरलेलो होतो, मी पेन्टेकॉस्टलमध्ये मुरलेलो होतो." हो, तुम्ही तसे आहे? मला हवंय की मी देवामध्ये मुरलो पाहिजे. होय, तेच तर. पाहा. ठिक आहे.

> *...पूर्वजांच्या संप्रदायाविषयी*
>
> *परंतु जेव्हा देवाला हे बरे वाटले...* (हो, पौला तू येथवर आलास) *...तरी ज्या देवाने मला माझ्या मातेच्या उदरांतून जन्मल्यापासून वेगळे केले,* व या जगात मला आणले, *आणि आपल्या कृपेने बोलाविले.*
>
> *त्याला आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रगट करणे बरे वाटले,...*

122 हे कसे काय? "पवित्र आत्मा माझ्यामध्ये! हे देवाला बरे वाटले की त्याने मला निवडावे, त्याने मला मातेच्या उदरांतूनच वेगळे केले, आणि मला पुत्र लाभला, जो पवित्र आत्मा आहे, आत्म्याच्या स्वरुपामध्ये माझ्यामध्ये यासाठी की त्याने स्वत:ला माझ्यामध्ये प्रगट करावे." हो, माझ्या! काय म्हणता? मला——मला——मला वाटते मी मोठ्याने ओरडून व्यक्त करावे.

123 पाहा, भावा, मला हे सांगु द्या. जे देवाला ते बरे वाटले! हो, हालेलुयाह! जेव्हा देवाला बरे वाटते! एक दारुडा बाप. एक माता...परमेश्वर आशीर्वाद देवो, माता, मी तुमच्या विरुध्द काही बोलू इच्छित नाही. परंतु एक आई जी देवाला ओळखत नाही तिच्यापेक्षा एक ससा ज्याला माहीत आहे की बर्फात जाताना, बर्फाचे बूट घालावेत. आणि जो रस्त्यावर पिऊन पडलेला असतो. आणि पायात शाळेत जाण्यासाठी घालायला बुटंसुध्दा नाहीत, आणि लांब केस माझ्या मानेपर्यंत वाढलेले आणि सर्वजण माझा तिरस्कार करीत, कारण मी एक कंटकिमधला रहिवासी असा इंडियाना येथे आलेलो. आणि किती, हो, किती ते दृष्टीला किळसवाणे वाटे, परंतु ते देवाला पसंत होते! आमेन. ते देवाला आवडे, ज्याने मला माझ्या मातेच्या उदरांतूनच वेगळे केले होते, यासाठी की त्याने आपला पूत्र माझ्याठायी प्रगट करावा, देवाच्या वचनाचे सेवक बनविले. ज्याने मला त्याच्याशी योग्य व सरळ ठेवले, ते असे की त्याने दृष्टांत आणि चिन्हे आणि अद्भूते आणि चमत्कार दाखवावे. आणि, ओह, माझ्या देवा!

124 पाहा, हा काय बोलत आहे? देवाला ते करायला आवडले! कसे? लक्षपुर्वक ऐका. “ते...” 16वे वचन आता घेऊया.

> *त्याला आपल्या पुत्राला माझ्या ठायी प्रगट करणे बरे वाटले, अशासाठी की, मी* परराष्ट्रीयांमध्ये *त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी. तेव्हा* मानवांची *मसलत न घेता:*

125 “मी काय करावे हे विचारण्यासाठी मी कधीही कोणा बिशपकडे गेलो नाही. मी कधी मांस व रक्ताकडे गेलो नाही, नाही ही कोणा संस्थेकडे किंवा अशासारखे अजून कोणाकडे. मला त्यांच्याशी काही कर्तव्य नाही. मी कधीही मांस व रक्तांशी सल्ला मसलत करित नाही. मी यरुशलेमातील जे मोठे पवित्र याजक आणि पवित्र पिता आणि अजून ही दुसरे यांच्याकडे ही मी कधी गेलो नाही. आणि म्हणाला, ‘आता, तुम्हाला माहीत आहे मला एक दृष्टांत आला, मी त्यासाठी काय करु?’ मी त्या दृष्टांतामध्ये प्रभू येशूला पाहीले. ते म्हणाले, ‘तू येथून चालता हो!’ काय...तुम्ही देववेडे व्यक्ती! ठिक आहे, काय झाले तुला? नाही, माझ्याकडे सुरुवातीपासूनच त्यांच्या सर्व विद्यापीठ पदव्या आहेत...”

126 आणि पौलाने येथे सांगितले आहे, मी ते तुम्हाला पवित्र शास्त्रात दाखवू इच्छितो, त्यात त्याने असे म्हटले आहे, जे काही तो शिकला होता ते त्याला आता विसरायचे होते, कारण ते त्याला केरकचरा असे झाले होते, यासाठी की त्याने ख्रिस्त मिळवावा. हो!

> *आणि माझ्यापूर्वी झालेल्या प्रेषितांकडे यरुशलेमेस वर न जाता, मी* लागलाच *अरबस्थानांत निघून गेलो, व* तेथून *दिमिष्कास पुन्हा परत आलो.*
>
> आणि *मग तीन वर्षांनंतर मी केफाला भेटायला यरुशलेमेस वर गेलो, व त्याच्याजवळ पंधरा दिवस राहिलो.*

127 आणि आम्ही जर पुढे वाचत गेलो, आम्हाला असे कळते की तो आणि प्रेषित पेत्र कधीही एकमेकांना आयुष्यात भेटले नव्हते, एकमेकांना ओळखतही नव्हते, कधी एकमेकांना पाहिलंही नव्हत, परंतु जेव्हा ते एकत्र आले तेव्हा त्यांनी एकच शुभवर्तमान प्रचार केले. देवाची ही एक शाळा आहे. पाहा! होय.

128 येथे पेत्र होता, जो पेन्टेकॉस्टच्या दिवशी उभा राहिला व म्हणाला “तुमच्यातील प्रत्येकाने पश्चाताप करा, आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुमच्या पापांचे मोचन होईल, आणि तुम्ही पवित्र आत्म्याचे दान पावाल.”

129 फिलिप म्हणाला, “हे किती गौरवी आहे! मलाहि काही केले पाहिजे. ...मला एक शोमरोनातून बोलावणे आले आहे.” तो तेथे त्या ठिकाणी गेला व त्याला त्या रस्त्यावर साक्षी व्हावे लागले. पहिल्यांदा, एक आजारी व्यक्ती आला, त्याच्यावर हात ठेवले आणि उड्या मारण्यास सुरुवात करु लागला. म्हणाला “देवाला धन्यवाद, येथे मी आहे!” तेथे मोठ्या सभेला सुरुवात झाली. तो म्हणाला, “तुम्हाला सर्वांना पवित्र आत्मा असायला हवा.” तो म्हणाला, “तुम्हाला काय केले पाहिजे तर येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घेतला पाहिजे.” म्हणून त्याने त्यांना प्रत्येकांना बाहेर घेतलं आणि येशूच्या नावात त्या सर्वांचा बाप्तिस्मा केला. तो म्हणाला, “पेत्रा ये आणि आपले हात त्यांच्यावर ठेव.” आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला.

पेत्र, कर्नेलच्या घरी ही, अशाचप्रकारे गेला.

130 पौलाने तर त्याला कधी बघीतले नव्हते किंवा कधी ऐकले ही नव्हते. परंतु तो इफिसच्या वरच्या किनारपट्टी जवळून गेला, व त्याला काही शिष्य आढळले. त्याला एक बॅप्टीस्ट प्रचारक सापडला, तो अपुल्लो, हा एक बदलला गेलेला शास्त्री होता, हुशार,

बुध्दीमान, तो जुन्या करारांतील वचने घेऊन आणि सिध्द करुन दाखवित होता की येशू हा देवाचा पुत्र आहे. होय, श्रीमान, तो शास्त्र पारंगत होता. आणि ते ओरडणारे होते, त्यांना फार आनंद वाटत असे. पवित्र शास्त्र असे सांगते. तुम्ही प्रेषित कृत्ये याचा 18 आणि 19वा अध्याय वाचा आणि पाहा कि ते बरोबर आहे की नाही. तुम्हाला माहीत आहे. त्यांना फार आनंद झाला होता, ते आत्म्यामध्ये नाचत होते, आणि येथे तेथे धावत होते. पौल त्यांना म्हणाला, "परंतु तुम्ही विश्‍वास ठेवला तेव्हा तुम्हास पवित्र आत्मा मिळाला काय?"

131 आणि तुम्ही जे बॅप्टीस्ट बंधुजन जे लोकांच्या घशात हे घालण्याचा प्रयत्न करता आणि म्हणता की मूळ ग्रीक भाषेत असे म्हटले आहे, म्हणता, "तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय, विश्‍वास ठेवला *तेव्हा* मिळाला की त्यानंतर?" मी तुम्हाला आवाहन करित आहे की तुम्ही ग्रीक घेऊन या! माझ्या स्वतःकडे मुळ ग्रीकची प्रत आहे. माझ्याकडे अरॅमिक आणि हिब्रु सुध्दा, आहेत. त्या प्रत्येकात सांगितले आहे, "तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय तुम्ही विश्‍वास *केल्या*नंतर?"

132 विश्वासाद्वारे तुम्ही वाचला आहात, हा तुमचा देवामधील विश्‍वास आहे. रक्त हे तुम्हाला पापापासून शुध्द करते, कारण त्याने अर्पण होते. रक्त हे तुम्हाला वाचवित नाही, परंतु रक्त तुम्हाला शुध्द करते. तुम्ही कसे म्हणाल की तुम्ही वाचला आहात? विश्वासाद्वारे तुम्ही वाचला आहात, आणि ते देवाचे पाचारण आहे, जे पूर्वज्ञानानुसार आहे. तुम्ही वाचला गेलात, आणि रक्ताने तुमच्यासाठी प्रायश्चित केले, आणि कायम तुम्हाला शुध्द राखते. आणि नंतर एका आत्म्यात तुम्ही पवित्र आत्म्यामध्ये बाप्तिस्मा पावता, विश्‍वासणाऱ्यांच्या सहभागितेत आणि पवित्र आत्माच्या सहभागितेत, यासाठी की पवित्र आत्म्याद्वारे चालविले जावे, चिन्हे व अद्भूते व्हावी.

133 थांबा, तेथे मी येत आहे, मी कशाची वाट बघतोय, थोडसं थांबा, मिळतेय, आशा आहे आम्हाला कसेही करुन मिळेल. मी तुम्हाला म्हणालो की या वेळी मला बोलवा, नाही का? मी सहज त्याकडे पाहिले. आणखी एक—एक शब्द किंवा दोन पेक्षाही अधिक… थोड—थोडसं जास्त.

134 तारण हे किती काळ टिकते, किती काळ? कोणत्या प्रकारचे हे तारण आहे? मंडळीतून मंडळीत?…इब्रीकरांस पत्र 9:11 कडे वळू या, एक मिनिट, थोडं मला पाहू दे किती वेळ. इब्रीकरांस पत्र या पुस्तकात वळू या आणि शोधू या—या की किती काळ हे तारण टिकत असते. पाहू या, कोणत्या प्रकारचे हे तारण आहे. आता आपण वाचूया इब्रीकरास पत्र 9:11.

> *ख्रिस्त हा* पुढे होणाऱ्या *चांगल्या गोष्टींसंबंधी प्रमुख याजक होऊन आला व जो हातांनी केलेला नाही, म्हणजे या सृष्टीतला नाही अशा अधिक श्रेष्ठ व पूर्ण मंडपांतून…* (आता, पाहा, हा तोच पौल व शिक्षक)
>
> *आणि बकरे व वासरे ह्यांचे नव्हे, तर स्वतःचे रक्त अर्पण करुन एकदाच परमपवित्र स्थानांत गेला,* (किती वेळा? एकदाच!) *आणि* त्याने…(एका आठवड्यासाठी तारण काय? पुढचे संजीवन येईपर्यंत तारण काय? कोणत्या प्रकारचे?) *…त्याने सार्वकालिक मुक्ती मिळविली.*

135 "सार्वकालिक" या शब्दाचा अर्थ काय? हे ख्रिस्तामध्ये, मी विश्‍वास ठेवल्यावर… कोणीही मनुष्य येशूला "ख्रिस्त," म्हणून पवित्र आत्म्याशिवाय म्हणू शकत नाही. म्हणून तीन प्रकारची लोकं आज आहेत; अविश्‍वासी, बनविलेला विश्‍वासी, आणि विश्‍वासी.

परंतु ज्यांनी कोणी त्यावर म्हणजे सार्वकालिक जीवनात विश्वास ठेवला त्यांचा त्या अंगणात प्रवेश झाला आहे.

136 जुना मंदिराचा मंडप घेऊया, त्याने कोणती गोष्ट पहिली केली? अंगणात गेले, परराष्ट्रीय. त्यानंतर पितळेचे क्षालनपात्र, जेथे ते यज्ञपशुला सोनेरी गंगाळात धुत असत. नंतर पशुला यज्ञासाठी मारण्यात येई, आणि रक्ताचे शिंपडणे वेदीवर होई. त्यानंतर, वर्षांतून एकदा, अहरोनाला अभिषेक होई, हो, (कशाने?) शारोन गुलाबांतील सुगंधाने, अतिमौल्यवान असे तेल ज्यामध्ये सुवास असे, ते त्याच्या मस्तकावर ओतण्यात येई, ते त्याच्या वस्त्राच्या काठावर ओघळत असे. पाहा, ह्या व्यक्तिला कसे त्या पडद्यापलिकडे जावे लागे, वर्षांतून एकदा, दयासनावर रक्त ओतावे म्हणून जमा करुन नेई. आणि तो त्याची काठी त्यावर्षी उचली आणि विसरुन जाई. जेव्हा ते सर्व त्याच्यानंतर निघून जात, तेव्हा त्या काठीला कळ्या येऊन ती फुलली. ही एक फार जून झालेली काठी जी जवळजवळ चाळीस वर्षे रानांत होती, ती त्या पवित्र ठिकाणी ठेवण्यात आली. पाहा, जेव्हा त्यांनी तो रक्ताचा करार घेतला, रक्ताचा, तेव्हा त्याला अभिषेक केला. आणि त्याच्या त्या वस्त्रावर घुंगरु व सुताचे डाळिंबे लावलेली असत आणि त्या व्यक्तीला असे चालावे लागे की ज्या प्रत्येक वेळी तो आपले पाऊल टाकी, आणि *अशाप्रकारे* चाले आणि पाऊले उचली, त्यावेळी ते गीत गात "पवित्र, पवित्र, पवित्र देवासाठी पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी." माझ्या देवा!

137 मी कशाविषयी बोलत आहे? ब्रॅन्हम टॅबरनॅकल! ऐका. तुम्हाला तुमची संधी मिळाली होती. जेव्हा एखाद्या मनुष्याला पवित्र आत्म्याचा अभिषेक झालेला असतो, यासाठी की त्याने देवाच्या कुटूंबामध्ये समावेश करावा, पित्याद्वारे त्याची त्या ठिकाणी नेमणुक केली जावी, आणि त्याला सेवेसाठी स्थापन केले जावे, त्याच्या जीवनाविषयी असणाऱ्या उद्देशामध्ये, किंवा ज्या कारणांसाठी देवाने त्याला पाचारण केले आहे, त्याची चाल "पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी पवित्र, पवित्र, पवित्र, पवित्र असलीच पाहिजे!"

"हो, तुम्ही *या* बाजूला वळायला हवे आणि..."

"पवित्र, पवित्र, पवित्र, प्रभूसाठी प्रभूसाठी पवित्र"

"हो, तुम्ही त्या सर्वांवर विश्वास केला पाहिजे तो वडील जे सांगतो, *हे*."

138 परंतु, "पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी पवित्र." त्याचे वचन हे नेहमी पहिले असो, ते सगळे जसे आहे तसे असू द्या, हे तुमच्या हृदयात कायम बनो. तुमची चाल ही वचनामध्ये हवीच. "पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी पवित्र."

139 "हो, जर तुम्ही येथवर आले! मी तुम्हाला सांगतो, आपण काय करुया, आपण एक संस्था बनवू, तुम्हाला त्या संस्थेत जागा देऊ, तुम्ही महान व्यक्ती बनाल."

140 "पवित्र, पवित्र, पवित्र प्रभूसाठी पवित्र. पवित्र, पवित्र, पवित्र, प्रभूसाठी पवित्र," पुढे चालत राहा. कोण काय म्हणत आहे त्याने काही फरक पडत नाही!

141 "ध्वनीमुद्रीत केलेले आठवा! *हे* कर, *हे* कर, *ते* कर, *ते* कर आणि *इतर*."

142 "पवित्र, पवित्र, पवित्र, प्रभूसाठी पवित्र." तुमचे डोळे तुम्ही कलवरीकडे स्थीर केले आहेत, आणि कोणीही तुम्हाला थांबविणार नाही! तुमच्या जीवनाची चाल, तुम्ही राजमार्गावर चालत आहात, अतिमौल्यवान असा तेलाचा अभिषेक मिळाला आहे, परमपवित्र स्थानामध्ये चालत राहा. काय म्हणता? आमेन. ठीक आहे.

143 पौलाने म्हटले हे त्याला मनुष्यांपासून मिळाले नाही. आमच्या धड्यासाठी, गलतीकरांस पत्र, त्याने काय म्हटले. "त्याने आपल्या इच्छेचे रहस्य आम्हाला कळवावे."

त्याची काय इच्छा आहे? “त्याच्या इच्छेचे गुज त्याने आम्हास कळविले.” तुम्ही जे 9वे वचन घेतले आहे. आम्हाला उशिर होत असल्याकारणाने, मी आता जरा घाई करीत आहे.

144 हो, प्रत्येक वचन हे अशाप्रकारे...?...हो, प्रत्येक शब्द हा सोन्याचा गोळा आहे. तुम्ही तो घेऊ शकता आणि त्याला तकाकी आणू शकता, तुम्ही खणू शकता, मी...तुम्ही त्यातले काही शब्द घेऊ शकता, आणि ते उत्पत्तीमध्ये नेऊन त्याला तकाकी द्या, तुम्ही त्याला निर्गमनमध्ये घेऊन जा आणि परत तकाकी द्या, तुम्ही त्याला लेवियमध्ये घेऊन जा आणि पुन्हा तकाकी द्या आणि मग त्याला प्रकटीकरणामध्ये घेऊन या, हा येशूचा प्रत्येक अंश आहे! आमेन. तुम्ही त्याला तकाकी द्या, जेवढी तुमची इच्छा होती तेवढी, तुम्हाला येशूच सापडेल जेव्हा तुम्ही त्याला तडाखा देता—जेव्हा तुम्ही प्रकटीकरणाला तडाखा देता. कारण तो म्हणाला, “मी तो आहे, जो होता, जो आहे आणि जो येणार. मीच दाविदाचे मुळ व संतान आहे, पहाटेचा तारा. मी अल्फा, ओमेगा आहे.” ग्रीकमध्ये त्याला A आणि Z याचे मुळाक्षरांत दर्शविलेले आहे. “मी A पासून Z पर्यंत आहे. **मी आहे**! मी सर्वात सर्वकाही आहे.” होय, ते बरोबर आहे. “मी तो आहे जो मेलो होतो परंतु आता जिवंत आहे, आणि सदासर्वकाळ जिवंत आहे. माझ्याकडे मरणाच्या व अधोलोकाच्या किल्ल्या आहेत.” हे देवा! प्रत्येक सोन्याचा गोळा तुम्ही उचलावा व त्याला तकाकी देण्यास सुरुवात करावी, त्याचे रुपांतर येशूमध्ये होते.

145 आता, अजून थोडा वेळानंतर आणि मग आम्ही—आम्ही—आम्ही—आम्ही, आम्ही थांबू. होय. मग, आम्ही कशासाठी थांबलो आहोत? तुम्ही कशासाठी या ठिकाणी सभेमध्ये आहात? त्याचा उद्देश काय आहे? जग कशासाठी कण्हत आहे? का अणू बॉम्ब हे पलिकडे टांगुन आहेत? अणू आणि रेणू काय आहेत? आणि हो, हे सर्व कशासाठी आहे?

146 एक मिनिट, रोमकरास पत्र 8व्या अध्यायात वळा, ती का थांबली आहे? ते सगळे कसली वाट बघत आहेत? वेळ काय झाली आहे? रोमकरास पत्र 8 वा अध्याय, आपण वाचण्यास सुरुवात करु या, हो, मी म्हणेन आठ...सुरुवात करु...एकोणिसावे वचन, आणि ते—ते वाचत राहा यासाठी की ते खरोखर मधुर बनावे. होय ते खरे आहे. मला हे माहित आहे ते तुम्हाला तेथे मिळेल. ठीक आहे. रोमकरांस पत्र, 8 वा अध्याय. मी विश्वास करतो, आता बरोबर आहे. होय, श्रीमान 8 वा अध्याय, आणि त्याची सुरुवात 18व्या वचनांपासून करु या. 14व्या वचनापासून सुरुवात करुया.

*कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवीत आहे तितके...देवाचे पुत्र आहेत.*

हे सत्य आहे.

*कारण पुन्हा भीति बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला नाही...*

147 “हो, मला आश्चर्य वाटेल जर मी ते पकडून ठेवले व...मी जर ते पकडून आता ठेवतो!” मी काही पकडत नाही! मी पकडून ठेवले असे नाही, हे त्याने पकडले आहे. मी त्याच्यामध्ये आहे. बघीतले?

148 ठीक आहे, तुम्ही म्हणाल, “जर मी त्याच्यामध्ये आहे!” आता तुम्ही—तुम्ही प्रेसबेटेरियन्स म्हणाल, “होय, आम्ही कायम त्यांवर विश्वास करतो.” परंतु तुमचे जीवन सिध्द करते की तुम्ही करीत नाहीत, तो जसा चालला तशा जीवनात जर आम्ही चालत असू, त्याने प्रचार केलेल्या त्याच शुभवर्तमानावर तुम्ही विश्वास करता.

149 तुम्ही म्हणता. “होय” बॅप्टीस्ट म्हणतात, “खात्रीपूर्वक, मी विश्वास करतो अनंत सुरक्षिततेवर.” आणि तेथे बाहेर जातो आणि धुम्रपान करतो आणि नाच-तमाशाला

धावतो, आणि स्त्रीया त्यांचे केस कापतात, चेहऱ्याला रंग लावतात आणि कृती अशी करतात की काय, मला–काय–माहित–नाही? तुमची फळे दाखवितात की तुम्ही विश्वास करित नाही.

जेव्हा मी म्हणतो, "तुम्ही दैवी आरोग्य प्राप्तीवर विश्वास करता का?"

"काय आहे की डॉक्टर जोन्स म्हणतात ते *तसे* आहे, ते त्या दिवसांमध्ये चालायचे."

150 आता, तुम्ही ढोंगी! तुमचे हे काय चालले आहे? तुम्ही बिचारे फसवणूक केलेली मुले आहा. तुमची मला दया येते, तुम्ही शुभवर्तमानापासून फार दूर आहात. कचऱ्याचा ढीग जो जळतो त्याच्या बाजूतून तुम्ही चिखलाचा रस्ता धरुन उद्दीष्टांपासून परावृत्त झाला आहात. त्याने काय म्हटले हे तुम्ही पाहात नाहीत काय? जो, प्रत्येक आत्मा कबुली देत नाहीए की येशू आता देहात आला आहे, तो खोटा आत्मा आहे. बायबल म्हणते की येशू ख्रिस्त हा काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. त्यानंतर त्याने काय म्हटले, तो आता आहे, तो कायम त्याचप्रमाणे असणार. ऐका फक्त.

> *तुम्ही पुन्हा भ्यावे असा दासपणाचा आत्मा तुम्हास मिळाला* नाही, *परंतु तुम्हास तो...*

[मंडळी म्हणते, "*दत्तकपणा*."—सम्पा.]

151 आता, तुमचे दत्तकपण झाल्यावर, ठीक आहे, तुमचे दत्तकपण झाल्यावर. तुमची योग्य स्थळी नेमणूक होते, मग तुम्हाला समज येते, त्या विधीमध्ये म्हटल्याप्रमाणे तुम्ही त्या शरीरामध्ये योग्य प्रकारे बसता. तुम्ही पुत्र आहात, खात्रीपूर्ण कन्या आहात, जेव्हा तुम्ही नविन जन्म पावला तेव्हापासून, हा तुमचा जन्म आहे. परंतु आता तुम्ही योग्य स्थळी नेमलात.

> *कारण पुन्हा* भिती *बाळगावी असा दासपणाचा आत्मा* तुम्हाला मिळाला *नाही. तर ज्याच्या योगे आपण अब्बा, बापा अशी हाक मारतो.* त्याचा अर्थ "माझा देव." ठीक आहे.

> *तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर* साक्ष *देतो की,* आपण—आपण *देवाची मुले आहो.*

152 ते कसे करतात? तुम्ही म्हणाल. "देवाला धन्यवाद! हालेलुयाह! मला त्याचा काही त्रास होत नाही, मी देवाचे लेकरु आहे," आणि बाहेर जाता आणि तुम्ही ते करता? देवाचा आत्मा देवाची कामे करतो.

153 येशूने म्हटले, "मी जी कृत्ये करतो, माझ्यावर विश्वास करणारा त्याहूनही अधिक करिल." समजले? समजले?

154 जर—जर—जर—जर ही द्राक्षलता वाढली आणि तीने द्राक्षांचा घट दिला, आणि त्यानंतर पुन्हा वाढून जर अनेक भोपळे दिले तर त्यामध्ये काहीतरी खोटेपणा आहे. पाहा? ही कलम केलेली मंडळी आहे, ही कलम केलेली द्राक्षलता आहे, हा कलम केलेला व्यक्ती आहे. एक व्यक्ती तो सांप्रदायिक कलिसियाचा आहे, तो संप्रदायाशी संबंधीत आहे आणि स्वत:ला ख्रिस्ती समजतो; आणि पवित्र आत्मा नाही आणि देवाचे सामर्थ्य आणि इतर अनेक गोष्टी...

155 आता, जर तुम्ही बाहेर गेला आणि कोणा एका दारुडा व्यक्तीची कामे करु लागाल, कारण तुम्ही अनन्य भाषेत बोलता. मी दुष्ट आत्म्याला अनन्य भाषेत बोलताना ऐकले आहे. होय, श्रीमान. मी त्यांना आत्म्याने नाचतानाही पाहीले आहे, आणि ओरडताना,

आणि तोंडातून फेस काढताना आणि इतर अनेक गोष्टी आणि पुष्कळ काही मी हे पाहिलेलं आहे…मी त्याबद्दल बोलत नाहीए. मी देवाच्या आत्म्याबद्दल बोलत आहे.

*तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर* साक्ष *देतो की, आपण देवाची मुले आहो:*

*आणि जर मुले तर वारसही आहो, म्हणजे देवाचे वारिस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारीस असे आहो; आपल्याला…त्याच्याबरोबर गौरव प्राप्त व्हावे म्हणून त्याच्याबरोबर जर दु:ख भोगित असलो तरच.*

*कारण सांप्रत काळाची* दु:खे *काहीच नाहीत…*

156 याकडे लक्ष द्या, हो, हे सुंदर नाही का!

*कारण आपल्यासाठी जे गौरव प्रगट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची* दु:खे *काहीच नाहीत असे मी मानतो,*

*कारण सृष्टी देवाच्या पुत्रांच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा अत्यंत उत्कंठेने करीत आहे.*

157 हे येथे लक्ष वेधते, इथे थोडे—तेथे थोडे शब्द, ह्या लहान समासात "सृष्टी" हा शब्द वाचतोय व तो बरोबर आहे ग्रीकमध्ये.

…*कारण* सृष्टी *देवाच्या पुत्रांच्या प्रगट होण्याची* प्रतिक्षा *अत्यंत उत्कंठेने करीत आहे.*

158 सर्वकाही कशासाठी थांबले आहे? संपूर्ण सृष्टी कशाची वाट पाहत आहे? देवाच्या पुत्रांची प्रगट होण्याची वाट पाहत आहे. मंडळीला आपल्या जागी स्थापित व्हावे म्हणून वाट पाहत आहे. देवाचा पुत्र कोण होता, जेव्हा आदाम, त्याचे वर्चस्व कशावर होते? पृथ्वीवर. त्याचे, त्याचे वर्चस्व संपूर्ण पृथ्वीवर होते. हे सत्य आहे ना? [मंडळी म्हणते "आमेन"—सम्पा.] तो एला, एला, एलोहिम नव्हता, तर तो यहोवा होता. पाहा? म्हणजे, "मी देव आहे, आणि मी माझ्यापेक्षा कमी केलेला माझ्या अधिन बनविला आहे. आणि मी त्यांना वर्चस्व दिले. आणि ह्या त्याच्या कार्यक्षेत्रामध्ये, पृथ्वीही त्याच्या सत्तेखाली होती." मनुष्याला पृथ्वीवर वर्चस्व होते. आणि संपूर्ण सृष्टी आज देवाच्या पुत्रांच्या प्रगट होण्याची वाट अत्यंत उत्कंठेने करित आहे. ओह!

आम्ही पाहत आहो येणाऱ्या आनंदीत हजार वर्षाच्या दिवसाची,
जेव्हा आमचा धन्यवादीत प्रभू येईल आणि त्याच्या वाट
पाहणाऱ्या वधुस उचलून नेईल.
ओह, पृथ्वी ही कण्हत आहे, ओरड करत आहे त्या दिवसासाठी
जेव्हा मधूर मुक्ती होईल,
जेव्हा आमचा मुक्तीदाता या पृथ्वीवर पुनरुपी येईल.

159 हे बरोबर आहे काय? वाट पाहत आहे. देव प्रयत्नशील आहे की त्याच्या मंडळीस त्याने योग्य जागी स्थापावे, यासाठी की त्याने स्वत:स प्रगट करावे, त्याला असा एक मिळावा ज्याद्वारे तो आपले काम करु शकेल, म्हणेल, "तेथे माझा आत्मा मुक्तपणे वाहत आहे, तेथे तो आहे, तेथे, यासाठी की मी काम करावे." येथे, दुसऱ्यास ही आणि आणि नेमणुक करा, "मी—मी त्याची नेमणुक करतो." दत्तकपणा, नेमणूक, प्रगट होणे, त्याला तेथे बाहेर काढणे आणि दत्तकपणाच्या विधी त्याच्यावर बजावणे, दूतासंगे भेट देणे, काही गोष्टी सांगणे. आता, जर त्याने सत्य सांगितले आहे! आता जर तो काहीतरी करीत आहे, तर त्याने काम होणार नाही. नाही, नाही त्याने—त्याने काम होणार नाही, आम्हाकडे

तसे पुष्कळ आहेत. परंतु माझे सांगणे, माझा अर्थ—माझा अर्थ हा की देवाच्या पुत्रांचे प्रगट होणे होय, जेव्हा देव स्वत:ला प्रगट करतो आणि तो त्याला पाठवितो. आणि तो पुढे जातो, आणि तो जे बोलतो ते सत्य असते. तो जे करतो ते सत्य असते. तो काय करतो, तो ख्रिस्त प्रगट करितो. तुम्ही त्याला कसे पारखाल तो वचनाला धरुन राहतो, तो वचनाशी खरा असतो. पाहा, तसेच तुम्ही सर्व माणसांना ओळखू शकाल की तो वचनाशी बनून राहतो. "जर ते वचनाप्रमाणे बोलत नसतील तर त्यांच्यामध्ये जीवन नाही." असे बायबल म्हणते. पाहा? त्यांना बाजूला ठेवा.

160 आता, वाचूया, मग आम्हांला—आम्हांला थांबावे लागेल, कारण आपली वेळ निघून जात आहे. ठिक आहे. 10 व्या वचनांत. किंवा 9 व्या वचनांत.

> *ख्रिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या* योजनेप्रमाणे *त्याने स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचे रहस्य* आपल्याला *कळविले.*

161 जगाच्या स्थापनेअगोदरच त्याने ही योजना स्वतःमध्ये केली होती. कितीजण हे समजत आहेत? पाहा?

> *ती योजना अशी की, कालखंडाच्या...*

162 बाप रे, येथे आम्ही परत येतो! हा! ओह, आता वाचूया, पाहा.

> कालखंडाच्या *पूर्णतेची व्यवस्था लावताना...*

163 तुम्ही कालखंडावर विश्वास करता काय? बायबल असे म्हणते म्हणून, "कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था," पूर्णतेची वेळ काय? येथे कालखंड आहेत, तसेच मोशेच्या नियमशास्त्राचा कालखंड होता, योहान बाप्तिस्मा करणाऱ्याचा कालखंड होता. तेथे ख्रिस्ताचा कालखंड होता. तेथे संस्थेच्या मंडळीचाही कालखंड होता. पवित्र आत्मा ओतला गेला त्याचा ही कालखंड होता. आता दत्तकपणाचा कालखंड आहे, जग त्यासाठी थांबले आहे आणि कण्हत आहे. "आणि जेव्हा पूर्णतेची वेळ येते, जेव्हा कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था." ते पूर्णतेची वेळ काय आहे? जेव्हा मृत जिवंत होऊन उठतील, जेव्हा आजार टळून जाईल, जेव्हा...जेव्हा संपूर्ण पृथ्वी कण्हणे थांबवील. "कालखंडाच्या पूर्णतेची वेळ." हे पाहा.

> जेव्हा *ती योजना अशी की, कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना ते सर्व ख्रिस्तांमध्ये एकत्र करावे,...*

164 तुम्हाला आनंद नाही का वाटत? तो हे सर्व कसे करणार आहे? सर्व काही कशात एकत्र करणार आहे? [मंडळी म्हणते, "ख्रिस्तामध्ये."—सम्पा.] तुम्ही ख्रिस्तामध्ये कसे येऊ शकता. ["एका आत्म्याने."] एका आत्म्याने आम्ही सर्व त्यामध्ये बाप्तिस्मा पावलो आहो ["एक शरीर."] एक शरीरमध्ये. आणि ते शरीर कोणाचे शरीर बरे? ["ख्रिस्ताचे."] ज्याचा न्याय होऊन चुकला. ["आमेन."] त्याने आमचा न्याय स्वतःवर घेतला. तर मग आम्ही कोण आहो? "मी जेव्हा काय पाहिन ["रक्त."] रक्त, तेव्हा मी ओलांडून जाईन." जेव्हा जेव्हा तो शरीराकडे पाहतो, तेथे तो बसलेला दिसतो, जो वधला गेला होता. मी त्याच्यामध्ये कसा आहे? पवित्र आत्मा. तो ओलांडून जातो. बापरे!

> आणि ती योजना अशी की, कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना *स्वर्गात...व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये...एकत्र करावे.*

165 आता, जर तुम्ही नावाबद्दल बोलू इच्छिता, आम्ही त्याला थोड्या वेळेनंतर पाहणार आहोत. स्वर्गातल्या सर्व कुटुंबास काय नाव देण्यात येते? [मंडळी म्हणते–"येशू ख्रिस्त."—सम्पा.] पृथ्वीवरील सर्व कुटूंबास काय नाव देण्यात येते? ["येशू ख्रिस्त."]

166 येथे आपल्यामध्ये काही सुरेख स्त्रियां आहेत, सुरेख, संपन्न, एक सभ्य महिला, महिला. तेथे एकच श्रीमती. ब्रॅन्हम आहेत, श्रीमती. विल्यम ब्रॅन्हम ती माझी पत्नी आहे, ती माझ्याबरोबर घरी जाते. पाहा. बाकीचे आपापल्या पती बरोबर जातात.

167 तेथे एक महान जिवंत देवाची जिवंत मंडळी आहे. तीने त्याचे नाव धारण केले आहे, ती त्याच्या आत्म्याने भरलेली आहे. हे बरोबर आहे. मी...

168 मी चांगल्या कामांना दोष देत नाहीए, मी त्यांच्या हॉस्पिटल व इतर जी चांगली कामे ते करितात त्यांना दोष देत नाहीए. मला वाटते ते विस्मयकारण आहे, आणि मनुष्य जातीला जे भोग आहेत त्यांतील गरीबांना हा देवाचा आर्शिवाद आहे. मी त्यांना त्याबद्दल दोष देत नाहीए. ह्या ज्या इतर गोष्टी ते करतात. हे योग्य आहे, बरोबर आहे. आणि त्याचे महान संस्था आणि लक्षावधी डॉलर, हे त्या कोपऱ्यातील दारुच्या दुकानांपेक्षा मी पाहणे पसंत करिन. मी त्या सेवकांना व्यासपिठावर उभे पाहून मी त्यांचा खरोखर मान ठेवीन.

169 परंतु कालखंडाच्या अंती जेव्हा एकत्र जमा होणे होईल, तेव्हा देवाच्या पुत्रांची प्रगट होण्याची प्रतीक्षा केली जाईल, त्या कालखंडात...तेव्हा तो सर्वांना एकत्र जमविल जे ख्रिस्तामध्ये आणले होते. ख्रिस्त काय आहे? कसे...आम्ही त्यामध्ये समाविष्ट कसे होतो? 1 करिंथ 12 "त्या एकाच आत्म्याद्वारे आम्ही सर्व त्या एका शरीरात बाप्तिस्मा पावलो, जे ख्रिस्ताचे शरीर आहे, आणि त्याने आम्हाला त्याच्या प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक उत्तम गोष्टीचे भागिदार केले." हे खरे आहे ना? "आणि पृथ्वी ही कण्हत आहे, वेदना भोगित आहे, आणि प्रकटीकरणाची वाट पाहत आहे जेव्हा ख्रिस्त आणि त्याची मंडळी ही ऐक्यात होतील."

*ती...योजना अशी की, कालखंडाच्या पूर्णतेची...व्यवस्था लावताना स्वर्गात व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये एकत्र करावे.*

*त्या ख्रिस्ताच्या ठायी आम्ही वतनदार झालो आहो...*

170 ओह, भाऊ नेविल, मला क्षमा असावी वेळ अधिक घेतल्याबद्दल...हा शब्द "वतनदार." ओह-ओह-ओह-ओह! त्याने तसे केले पाहीजे. ओह-ओह-ओह-ओह! भावा, मला माहित आहे...की तो माझा निकटचा कुटुंबीय आहे...मला भरवसा आहे की मी वेडा नाही झालोय. मला—मला—मला...मला तसे नाही वाटत. परंतु, बापरे, ते काय? "वतनदार." आम्ही वतनदार झालो आहोत. कोणालातरी तुमच्यासाठी काही तरी सोडावे लागेल. देवाने, जगाच्या पायारंभापूर्वी, तुमच्यासाठी काहीतरी सोडले. एक नाव त्या पुस्तकात लिहिले गेले, की जेव्हा कोकरा वधला जाईल तेव्हा तुम्हीही त्यामध्ये ओळखले जाल. ओह! आजच्या रात्री ही गोष्ट राखून ठेवा. थोडेसे अजून पुढे वाचूया. किती अद्भूत! आजच्या रात्री आम्ही कसे बरे 3 रे वचन किंवा 3 रा अध्याय पाहू शकू? आम्ही त्यामधली चार-पाच वचने ही पाहिली नाहीत. जरी आता आपण बंद करणार आहोत, मी ते वाचू इच्छितो व तसेच सोडू इच्छितो.

*त्या ख्रिस्ताच्या ठायी आणि वतनदार झालो आहो...*

171 काय? आम्हाला कसे येथे वतन मिळेल? आम्हाला ते कसे मिळाले? कारण आम्ही सरळ चाललो? ते वतन आम्हाला कसे मिळेल? कारण आम्ही पूर्वीच नेमले होतो. आमेन. काय म्हणता? माझ्या अस्मिनियन भावांनो, मला हे माहीत आहे की हे फारच कठीण आहे. कोणाला दुखवावे असा उद्देश नाहीए, परंतु ते माझ्यासाठी इतके चांगले आहे की ते मी माहीत करुन घ्यावे...तुम्हाला—तुम्हाला—तुम्हाला ते समजले काय, समजले काय, भावा, ठीक आहे. तुम्हांला हे दिसत नाहीए. तसेच आहे तुमच्याकडे. पाहा? ठीक आहे पाहा? परंतु, ओह, परंतु त्याकडे पाहणे फार चांगले आहे. होय, जसे

ब्रदर नेविल काल एका कमानीदार छपराच्या ठिकाणाबद्दल बोलले त्यासारखे, “तुम्ही एक शीडी घेऊन फिरवा आणि पाहा तुम्हाला काय मिळते?” होय, महाशय. ज्यासारखेच देवाचा पवित्र आत्माही आमची शीडी आहे जी आम्हाला सांगते आम्हाला काय मिळाले आहे. समजले?

172 पाहा, वतनदार. बापरे! “असणे...” कोणत्या प्रकारचा वतनदार?

*...त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते.*

173 जेव्हा तो...पप्पा असण्यापूर्वी, तो देव असण्यापूर्वी, तो तारणकर्ता असण्यापूर्वी, तो आरोग्यदाता असण्यापूर्वी, या सर्वांपूर्वी त्याने पूर्वीच नेमले, कोकऱ्याचे नाव त्या पुस्तकात लिहिले गेले, त्याने आपल्या पूर्वज्ञानाने पाहिले आणि तुमची नावे पाहिली, आणि ती नावे त्यात लिहीलीही. ते काय आहे? आणि त्यानंतर आम्ही या जगात आलो, पापयुक्त माता-पिताद्वारे जन्मलो; आम्ही या जगात फिरु लागलो. तुम्हाला माहीत आहे. पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे ते म्हणजे नाकाची चोच असलेला यहूदी, पौल आणि तुम्हाला माहित आहे आणि तो काही वाहून नेत होता, आणि, पहिली गोष्ट, कोणी म्हटले, “येथे, येथे, येथे, येथे, येथे!”

तुम्ही म्हणाल, “ओह, आब्बा बापा!”

174 येथे आमची येण्याची सुरुवात आहे. पाहा. त्याच्याठायी आम्हाला वतनदार ठरवावे हे पूर्वीच नेमून ठेवले, जे आमच्यासाठी पूर्वी नेमले होते. पाहा, आम्ही त्याचे वतनदार होतो जगाच्या पायारंभापूर्वीच. पाहा? ओह! त्याच्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, तो देव आणि तारणारा असा नक्की ठरवा.

*त्याच्या नावावर तुम्ही भरवसा ठेवला, जेव्हा तुम्ही सत्याचे वचन ऐकले तेव्हा...*

175 आणि सत्य कोण आहे? येशू हाच सत्य आहे, शुभवर्तमानाचे सत्य आहे. कोणते शुभवर्तमान? तेथे एकच शुभवर्तमान आहे. गलतीकरांस पत्र 1ला, अध्याय म्हणते, “जरी स्वर्गदूताने दुसरेच काय शुभवर्तमान सांगितले, तर तो शापभ्रष्ट असो.” हे ते शुभवर्तमान आहे, तुमच्या तारणाचे शुभवर्तमान दुसरे काही नाही, दुसरे नाहीच. “दुसरे कोणतेही नाव दिलेच नाही—नाही या आकाशाखाली ज्याद्वारे तुमचे तारण होईल.” परंतु कोणाच्या नावाने? [मंडळी म्हणते “प्रभू येशू ख्रिस्त.”—सम्पा.] ओह!

*...त्याच्यामध्ये* तुम्ही *विश्वास केल्यावर, शिक्कामोर्तब केले गेलात...ओह,* तुम्ही *विश्वास ठेवल्यावर...*

176 ओह, “तुम्ही विश्वास ठेवल्यावर!” भावांनो, आम्ही त्यापासून पळू शकतो? आजच्या रात्रीसाठी हे असेच सोडत आहे, तुम्ही काय म्हणता? बापरे! मी—मी त्याच्यापुढे जाऊ शकत नाही. आज रात्री आपण येथेच सोडू या. मी तो शब्द सोडू शकत नाही. “शिक्कामोर्तब.” त्यात तुम्ही कसे पोहचाल? पाहा.

177 पूर्वी नेमणुकीद्वारे वतनदार. मी कशाचातरी वतनदार बनलो आहे. कोणते वतन? तेथे माझ्यासाठी कोणीतरी वतन सोडलेलं असावे. का? तुम्ही म्हणाल, “येशूने तुमच्यासाठी वतन सोडून दिले.” मला क्षमा असावी? येशू तुमच्यासाठी काही वतन ठेऊन गेलेला नाही, येशू कधीही तुमच्यासाठी वतन देऊन गेला नाही. तो खाली आला आणि आमच्या वतनासाठी त्याने किंमत चुकती केली, आणि वतनाच्या भागात त्यांनी आम्हाला आणले...परंतु तुमचे नाव कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात घालण्यात आले जगाचा पाया

घालण्यापूर्वी. देवाने तुम्हाला तुमचा वतनभाग दिलाय तुमचे वतन हे प्रथम आहे. येशू फक्त आला...येथे खूप मार्ग आहेत. ओह, ते-ते बनविण्याचा प्रयत्न करतात. “देव म्हणत आहे, ‘अरे, पुष्कळ लोक नाश पावत आहे, कोणीच त्यांच्यातला तारण पावलेला नाहीए, म्हणून मी येशूला खाली पाठविन, आणि कदाचित तो त्यांना...काहींना पस्तावा येईल आणि कळेल मी काय केले आहे आणि मग ते वाचतील, तारण पावतील.’” हो देवा दया कर! मी अशाप्रकारे माझे काम करित नाही, जरी मी अशक्त असतानाही मी ते कधीतरी चालवितो. मी—मी तसे कधीच केले नसते. देवाबद्दल काय?

178 देवाने, त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, अचूक पाहिले कोण वाचले जातील आणि कोण वाचले जाणार नाहीत, त्याने येशूला त्यांना तारण्यासाठी पाठवले ज्यांची त्याने अगोदरच निवड केली होती. पौलाने असे सांगितले नाही काय, ह्याच्या मागील पाच वचने, की, “जगाच्या स्थापने अगोदर त्याने त्याच्यामध्ये आपली निवड केली”? तो आपला वतनभाग आहे. देवाने आपल्याला निवडले, आणि येशूला येऊ दिले आणि किंमत फेडू दिली. तेच काय? त्याच्या रक्ताच्या सांडण्यामुळे, आपल्याकडे कुठलेच पाप गणले गेले नाही. तुम्ही काहीच केले नाही. परंतु जर तुम्ही...

179 “कारण सत्याचे ज्ञान मिळाल्यावर आपण बुध्दीपुरस्सर पाप केले तर पापांबद्दल ह्यापुढे यज्ञ व्हावयाचा राहिला नाही.”

180 आता, आणि तेथे जेथे तुम्ही पुन्हा उभे राहाल, म्हणाल, “त्या विषयी कसे, भाऊ ब्रॅन्हम?”

181 परंतु ह्याकडे लक्ष द्या, पाहा, “ज्याला सत्याचे *ज्ञान* मिळाले आहे.” त्यांना सत्य कधीच मिळाले नाही. त्यांना फक्त त्याचे ज्ञान मिळाले आहे. पाहिले? त्यांच्यासाठी अशक्य आहे ज्यांना एकदा प्रकाश मिळाला, ज्यांनी स्वर्गीय दानाची रुची घेतली, जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले. देवाच्या सुवचनाची व येणाऱ्या युगाच्या सामर्थ्याची रुची घेतली. त्यांच्यासारखे काठावरचे विश्वासी तेथे मागे जातील. कित्येक जणांनी त्यावर मला पत्र लिहीले.

182 ते काठावरचे विश्वासी तेथे शेवटपर्यंत चालत गेले, यहोशवा आणि कालेबही तेथे बरोबर गेले. का? आता आपण त्याला पवित्र आत्मा म्हणून संबोधणार आहे, तो तेथे त्या भूमीत. *येथे* ते परत आले. किंवा *येथे* वर, म्हणाले *हा* पवित्र आत्मा आहे, आणि ते *येथे* परत आले. तुम्ही पाहिले. तेथेच *जेथे* अभिवचन आहे. “ठीक आहे, जर त्यांनी दहा हेर पाठविले, प्रत्येक वंशातील एक, ह्यासाठी की आपणा सर्व वंशांना कळू शकेल की आपले वतन काय आहे, सर्व कुठे जाणार आहेत, आपण कुठे जाणार आहोत. म्हणून, मी काही हेर पाठवणार आहे.”

183 ते सर्व तेथे गेले. “ओह बाप रे! नाही. आपल्याला तेव्हापासून देवविषयक वेडे असे संबोधले जाऊ लागले. नाही, हू-हू, आपण ते करु शकत नाही.” पाहा?

184 यहोशवा आणि कालेब म्हणाला, “मी पाहीन ते कशासारखे आहे.” म्हणून ते सर्व येथे आले आणि सभोवती पाहिले. बापरे, ते तेथे पोहचले आणि आणि त्यांनी द्राक्षांचा घड कापला आणि परत खाली आले. म्हणाले, “मुला, ती चांगली आहे, ती खूपच चांगली आहे! येथे त्यांच्यातील काही घे, ते खरोखरच चांगले आहेत.”

185 “ओह, ते चांगले आहे, परंतु, ओह, त्या अंजीराकडे पाहा ते किती मोठे आहेत... ओह, ते आपण करु शकत नाही. त्या मोठ्या संप्रदायाच्या विरुध्द उभे राहा, त्या मोठ्या गोष्टींविरुध्द राहा? ओह, हे फार वाईट आहे, आपण ते करु शकत नाही. नाही, महाशय! ते काही का असेना, आपण नाही करु शकत. नाही, श्रीमान.” आणि त्यांनी म्हणण्यास

सुरुवात केली, “ओह, आपण पुन्हा त्या मिसरातील मासांच्या भांड्याजवळ जाऊ या. आपण तेथेच खाली राहिलो असतो. तर व्यवस्थित असतो. आम्ही हे करु शकत नाही, हा रस्ता खूपच सरळ आहे. आम्हाला माहीत आहे आम्ही हे करु शकत नाही, आपण *ते* करु शकत नाही.”

186 वृध्द कालेब म्हणाला, “तुम्ही सर्व शांत राहा,” यहोशवा म्हणाला, “तुम्ही सर्वजण, तोंडे बंद करा! मला काही सांगू द्या.”

187 “ओह, नाही, नाही, नाहीच आपण ते करु शकत नाही! ओह, आपण नाही करु शकत. ठीक आहे, जर मला माझ्या पत्ते खेळणाऱ्यांचा मंडळ सोडावे लागेल, ब्रदर ब्रॅन्हम! जर मला माझे केस एका वृध्द स्त्रीप्रमाणे वाढु द्यावे लागतील, मला खरच काही कळत नाहीए मी काय करावे. जर मला माझे तोकडे विजार नाकारावे लागेल, मी—मी—मी तुम्हाला माहीत आहे, की मी हे अगदीच करु शकत नाही. आणि जर मला माझे धुम्रपान सोडावे लागेल, जर मला ते करावे लागेल!” तुम्ही जे हलक्या प्रतीचे बुध्दी पुरस्पर उदाहरण आहात. होय. “ते करु शकत नाही.”

188 यहोशवा म्हणाला, “ओह, ते चांगले आहे हालेलुयाह! आपण ते घेऊ शकतो.” ते काय होते? ते एका मोठ्या नगरासभोवती असलेल्या वेशीजवळ पाहत होते. आणि यहोशवा आणि कालेब देवाने दिलेल्या अभिवचनाकडे पाहत होते. वचनाबरोबर राहा. तुम्ही कोणीही का असेना, वचनाबरोबर राहा.

189 म्हणून पेत्र म्हणाला, “तुम्ही प्रत्येक जण पश्चाताप करा, आणि तुमच्या पापांचे मोचन व्हावे म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, कारण हे वचन तुम्हाला,” (कोणता वचनदत्त देश?) “तुमच्या मुलाबाळांना, व जे दूर आहेत, त्या सर्वांना म्हणजे जितक्यांना देव परमेश्वर आपल्या स्वतःजवळ बोलाविल त्यांना दिले आहे.”

190 बंद करीत असताना, हे तुम्हाला वाईट न वाटो, असे वाईट वाटून घेऊ नका. पाहा? तेथे तुम्ही पीलग्रीम होलीनेस आणि नाजरिनस, तुम्ही थेट पवित्र करण्यात येता, आणि त्या ठिकाणापर्यंत चालून गेलात जेथून तुम्ही जी द्राक्षे बघु शकला, आणि नंतर तुम्ही वळलात आणि परत गेलात. पाहा काय घडत आहे? हेच ते आहे, तुम्ही त्या भूमीत कधीच चालून गेला नाहीत. मला एक नाजरिन किंवा पिलीग्रीम होलीनेस दाखवा किंवा त्यांच्यातील एकतरी त्या भूमीवर आज चिन्हे व अद्भूते यांच्या सहीत सभा केल्या आहेत. मला एकतरी दाखवा. तुम्ही मिसरामध्ये स्थायिक झाला आहात, आणि लसणाच्या भांड्याकडे परत गेले. तुम्ही कादेश बर्णियाकडेच थांबले, हे खरे आहे.

191 पाहा, आणि मला तुम्हाला तुमची जागा दाखववायाची आहे, ती इब्रीकरास पत्र याच्या 6व्या अध्यायात. “ते जर पतित झाले तर त्यांना पश्चाताप होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे,” तुम्हाला हे चांगलेच समजते. जर तसे नाही, तर आता हे कळले आहे. पाहा? “आणि जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले, आणि स्वर्गिय दानांची रुची घेतली.”

192 रुची घेतली, पाहा, लोक मंडळीत जातात आणि सभोवती बसून म्हणतात, “तुम्हाला माहीत आहे, ते, ते बरोबर असू शकतात. त्याचे—त्याचे—त्याचे बरोबर असू शकते. ते अगदी असेच असू शकते, परंतु मी तुम्हाला सांगतो मुला, हे करण्यासाठी फार मोठा विश्वास लागतो.”

193 “स्वर्गीय दानांची रुची घेतली, आणि ज्याद्वारे तुमचे पवित्रीकरण झाले होते त्या कराराच्या रक्तास ‘अपवित्र गोष्ट,’ असे गणले.”

194 एका प्रचारकासारखे, त्याच्या आईने त्याला पाठविले. तो म्हणतो, “माझ्याकडे प्रभूचा दास होण्याचे पाचारण आहे.”

195 “ठीक आहे, पहिली गोष्ट मला करावी लागेल प्रिया, की मला फळा पुसावा लागेल आणि मी तुला कोणत्यातरी शाळेत पाठविणार आहे.” सर्वात वाईट गोष्ट जी तीने आतापर्यंत केली. हे बरोबर आहे. ते आता त्याच्या आतून सर्व बाहेर काढतील जे देव त्याच्यामध्ये घालण्याचा प्रयत्न करीत आहे. तर, आता पाहा.

196 “कारण सत्याचे ज्ञान मिळाल्यावर आपण बुध्दी पुरस्पर पाप केले, ज्ञान. ते पवित्र शास्त्रात पाहा आणि समजून घ्या की बायबल म्हणते. तो काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. पाहा, ते त्यांना सत्याचे ज्ञान आहे. ते पाहण्याकरिता, आमचे पतन झाले, आणि कराराच्या रक्ताला तुच्छ गणले...”

197 एक मनुष्य म्हणाला, “होय, मी देवावर—वर विश्वास ठेवतो,” ठीक आहे, तुम्ही पहिली पायरी पार केली.

198 “नक्कीच, मी पवित्रीकरणात विश्वास ठेवतो.” ठीक आहे, तुम्ही काठावर आहात, आणि पवित्र आत्मा स्विकारण्यास तयार आहात. परंतु तू वर बघितले आणि सांगितले, “मला—मला—मला त्याविषयी ठाऊक नाही. मला जर त्यांच्यासारखे वागावे लागेल...नाही. मला माहीत नाही. तुम्हाला माहीत आहे ते त्या लोकांना काय संबोधतात माहीत आहे? ऊह...मला ठाऊक नाही की मी ते करु शकतो किंवा नाही. नाही, मी विश्वास करतो मी चालत राहीन आणि सहभागी होईल...?...” पाहा? पाहा?

199 आणि तुम्हाला माहीत आहे काय घडते? तो म्हणाला, “त्यांच्यासाठी आत प्रवेश करणे हे अशक्य आहे.” त्यांच्या कृपेच्या दिवसांत पापाने पतित झाले. हे बायबल म्हणत आहे. मला माहीत आहे की हे कर्णकटू वाटेल, परंतु बायबल म्हणते, “त्यांनी स्वर्गीय दानांची रुची घेतली आणि कराराचे रक्त त्यांनी असे गणले...”

200 ते म्हणाले, “मी पवित्रीकरणावर विश्वास करतो, एक चांगले, स्वच्छ व पवित्र जीवन.”

201 निश्चितच, परंतु तुम्ही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा पाहिला, आणि बाप्तिस्मा आणि सर्व इतर गोष्टी ज्या बायबलमध्ये पाहिल्या, आणि तुम्ही काय केले? तुम्ही ज्या कराराच्या रक्ताद्वारे पवित्र झालात ते तुम्ही एक “अपवित्र गोष्ट,” गणली. हे मनुष्या या जगात काय आणलेस? काय...?...तुला पापी होण्यापासून कशाने तुला राखले तुझ्या जीवनातून पाप आणि धुम्रपान, आणि दारुबाजी, आणि स्त्रीया आणि अशा गोष्टी तुझ्या जीवनात नसायला हव्या होत्या? ते कोणी केले? ते कराराच्या रक्ताने केले! त्यानंतर तू द्राक्षाची चव घेण्यासाठी दुसऱ्या भूमीतून जवळ आला, आणि शुभवर्तमानाची लाज वाटली, व तुझ्या संघटनेची भिती वाटली! देवाने दया केली! होय, महाशय. “कराराचे रक्त तू अपवित्र गोष्ट ठरविली, कृपेचे कार्य असतानाही तू हे केलेस. त्या भुमिमध्ये प्रवेश करणे हे त्याच्यासाठी अशक्य–प्राय झाले.”

202 काय झाले? मी तुला विचारले. आता मी एक छायात्मक गोष्टी दर्शविणार आहे, आणि कोणीही मनुष्य जो बायबल जाणतो तो ही छायात्मक गोष्टी जाणणारा आहे. त्या मनुष्यांतील एकतरी आजपर्यंत वचनदत्त देशात पोहचला आहे काय? त्यांच्यातील एकही नाही. ते कोणी केले, तेथे कोण पोहचले? जे पहिले गेले, ते परत येऊन म्हणाले, “आपण ते घेऊ शकतो, आपल्याला पवित्र आत्मा मिळू शकतो; कारण देवाने तसे सांगितले आहे! पेत्र पेन्टेकॉस्टच्या दिवशी म्हणाला, जर मी पश्चाताप केला आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बातिस्मा घेतला, तर मला पवित्र आत्मा मिळाला पाहीजे. हे वचन माझ्यासाठी आहे. ते

करण्याची माझी इच्छा आहे. माझे, ते अभिवचन माझे आहे.” तुम्हाला ते समजले काय? “आता ते वचन माझे आहे. मला ते मिळाले आहे, ते माझे आहे. नक्कीच ते आहे.” ते तेच फक्त होते.

203 “ओह,” तुम्ही म्हणाल, “परंतु भाऊ ब्रॅन्हम, पुनरुत्थानमध्ये!” ते तेथे नसतील. “ओह! ते नसतील?” नाही, महाशय. येशू म्हणाला आहे.

204 ते म्हणाले, “तू मोशेसारखा स्वत:ला फार महान करीत आहेस, आणि तू म्हणाला तू होतास, तू अब्राहामाला पाहिले.” आणि तो म्हणाला, “आणि—आणि—आणि—आणि अब्राहाम तर मेला आहे! का? तू—तू अजून पन्नास वर्षाचा ही नाहीए, आणि तू म्हणतोस की मी अब्राहामाला पाहीले आहे?”

205 त्याने सांगितले, “अब्राहामापूर्वी **मी आहे**.” बापरे, “**मी आहे**,” सगळीकडे उपस्थित असलेला, अनंत देव. काल नाही, उद्या नाही, “**मी आहे**.” पाहा? सगळीकडे उपस्थित असणारा देव, “**मी आहे**.” त्यांनी त्याला...नंतर ते त्याला मारणार होते.

206 तो म्हणाला, “ठीक, आपल्या पूर्वजांनी अरण्यात चाळीस वर्षे मान्ना खाल्ला. देवाने आकाशांतून अन्नवृष्टी केली आणि त्यांना भरवले. ते मंडळीत गेले आणि ते चाळीस वर्षे मंडळीचे चांगले सदस्य होते. माझी वृध्द आई ह्याच मंडळीत मृत्यु पावली.” आणि सर्वकाही तशाच प्रकारे. “माझ्या पुर्वजांनी अरण्यात चाळीस वर्षे मान्ना खाल्ला.”

207 आणि येशू म्हणाला, “आणि ते प्रत्येकजण मृत्यू पावले.” *मृत्यु* म्हणजे, “सार्वकालिकेतून वेगळे होणे.” “ते प्रत्येकजण नाश पावले. परंतु मी तुम्हाला सांगतो, की मीच स्वर्गातून उतरलेली जीवंत भाकर आहे. जर कोणी मनुष्य ही आत्म्याची भाकर खाईल, त्याला सार्वकालिक जीवन मिळाले आहे आणि त्याचा नाश होऊ शकत नाही. आणि मी त्याला शेवटच्या दिवशी उठवीन.” ओह, भावा, तो किती अद्भूत आहे की नाही?

तो अद्भूत आहे की नाही, अद्भूत, अद्भूत?
येशू आपला प्रभू अद्भूत आहे की नाही?
डोळ्यांनी पाहिले आहे, कानानी ऐकले आहे. त्याची नोंद देवाच्या
वचनात आहे;
येशू आपला प्रभू अद्भूत आहे की नाही?

208 ते बरोबर आहे का? आपण पाहतो त्याचा पारखणारा आत्मा आमच्यामधून जात आहे. आपण त्याला चमत्कार आणि चिन्हे आणि अद्भूते करताना पाहात आहोत. आपण ऐकतो ते वचनात येथे लिहीले आहे, तुम्ही ते तेथे प्रस्थापित होताना पाहता. ओह बापरे!

डोळ्यांनी पाहीले आहे, कानांनी ऐकले आहे. देवाच्या वचनात
त्याची नोंद आहे;
येशू आपला प्रभू अद्भूत आहे की नाही?

209 आणखी दोन मिनिटात, किंवा तीन, तेथे पाण्याच्या बाप्तिस्म्याची सभा होईल. आणि आता ते जे बाप्तिस्मा, घेणारे आहेत, स्त्रीया *येथे* जातील, आणि पुरुष *ह्या* बाजूला जातील आणि आता पुरुष माझ्या डाव्या बाजूस, येथून *ह्या* बाजूला. आणि स्त्रीया *येथे*. तेथे बहिणी कपडे घेऊन तयार राहतील. आणि जर कोणी पुरुष अथवा कोणी स्त्री येथे ह्या सकाळी, सहमत झाले आहेत की तुम्ही देवाच्या वचनावर विश्वास ठेवता, आणि तुम्ही विश्वास करता की देव त्याचे वचन पाळतो, की जर एखादा मनुष्य मनापासून त्याच्या सर्व पापांचा पश्चाताप करील...आता, रक्ताने अजून एकही गोष्ट केली नाही. नाही, तो तुमच्या फक्त

देवावरील विश्वास आहे. आणि देव फक्त बोलावीत आहे "फ्यू, फ्यू, फ्यू!" तुम्हाला बोलावीत आहे. तेच तो आता करीत आहे, "फ्यू, फ्यू!"

"माझा कधीही बाप्तिस्मा झालेला नाही."

"फ्यू, फ्यू!"

"ठीक आहे, ठीक आहे, जर मी सुरुवात करु शकतो आणि वेगळे करतो."

"फ्यू!" तीच, तीच गोष्ट आहे, सुरुवात करा, नंतर—नंतर तुम्ही तुमची सुरुवात केल्यावर, तुम्ही वेगळे काही करता. पाहा? तुम्ही वळले पाहीजे, सुरुवात केली पाहीजे, पाहा.

तुम्ही म्हणता, "ठीक आहे, मी—मी—मी त्यासारखे ते कधीच पाहीले नाही."

210 ठीक आहे, प्रिय भावा, माझी इच्छा आहे की तू मला एकतरी वचन दाखवावे जेथे कोणी मनुष्य...मी हा प्रस्ताव, माझ्या एकतीस वर्षाच्या सेवकाईत सर्व जगभर, बिशप समोर मांडला आहे आणि अशाप्रकारे, जेथे एकाही व्यक्तीने, एकाही व्यक्तीने आजपर्यंत येशू ख्रिस्ताच्या नावाखेरीज दुसऱ्या प्रकारे बाप्तिस्मा घेतला आहे. आणि प्रत्येकजण ज्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला नाही, यावे लागेल आणि त्या नावात पुन्हा बाप्तिस्मा घ्यावा लागेल.

211 देवाला फक्त एकच नाव होते, आणि त्याचे नाव येशू आहे. तो त्याचा पुत्र होता, त्याने त्याच्या पुत्राचे नाव घेतले. देव! आता, येशू, शरीर मनुष्याचे होते. आपल्याला ते ठाऊक आहे. तो देवाचा पुत्र होता ज्याने छाया केली. आता आपण एकत्वाच्या पध्दतीत विश्वास करीत नाही. लोक असे म्हणतात देव तुझ्या बोटासारखा आहे. आपण विश्वास करतो...की देवाचे तीन गुणवैशिष्ट्य आहेत. देवाचे तीन तीन गुणवैशिष्ट्य, देव ज्यात प्रकट झाला. परंतु तेथे एकच देव आहे. पाहा? ते खरे आहे. आम्ही विश्वास ठेवीत नाही...आम्ही विश्वास ठेवतो...की देव तीन कार्यालयात राहतो. पृथ्वीवर त्याचे एकदा कार्यालय होते.

212 आता, तुम्ही स्त्रीया जे *या* बाजूला जाता, आणि तुम्ही पुरुष ते *या* बाजूला जाता, जे तयार होत आहा. आणि ते बाप्तिस्म्याच्या सभेसाठी आता तयारी करीत आहेत.

213 आणि, आता, देवाचे तीन कार्यालय आहेत. त्यांतील एकाला पितृत्व, किंवा पित्याचा कालखंड, त्यानंतरचा पुत्रत्व आणि त्यानंतरचा पवित्र आत्म्याचा कालखंड. आता, आज, कोणत्या—कोणत्या कालखंडात पिता कार्य करीत आहे? [मंडळी म्हणते "पवित्र आत्मा."—सम्पा.] पवित्र आत्मा. मागिल गेलेल्या दिवसांत तो कोण होता? ["येशू."] येशू. त्या अगोदरच्या दिवसात तो कोण होता? ["पिता."] परंतु तो एकच देव होता! हे सत्य आहे ना? तो पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा. हे तीन, तीन कार्यालये एका देवाची आहेत. एकच देव!

214 परंतु आता, पिता हे काही नाव नाहीए, हे सत्य आहे ना? मला हे तुम्हाला विचारु द्या. आता मी तुम्हाला मत्तयकृत शुभवर्तमान 28 अध्याय 19 वचन देत आहे, जेथे येशूने सांगितले, "तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिकवा, त्यांचा बाप्तिस्मा नावात करा," (N-a-m-e, नाव) "पित्याचे नाव..."

215 आता, मला हे पाहायाचे आहे की तुम्ही देवाचे वचन किती चांगले समजता, मला सांगा जर मी विषयाबाहेर गेलो. आणि तो त्यांना म्हणाला, "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरतो व बापिस्मा घेतो त्याचे तारण होते. जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल. आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे

असत जातील. ते माझ्या नावाने भुते काढतील," (हे सर्व सत्य आहे?) "नव्या नव्या भाषा बोलतील, सर्प उचलतील." आता मी तुम्हाला संदर्भ देत आहे, मत्तय...

216 आता ऐका, मी कोणीही इतिहासकारास विचारतो. आता हे सर्व ध्वनीमुद्रीत होत आहे, हे जगभर जाणार आहे. मी विचारतो कोणाही इतिहासकारास त्याने मजकडे यावे आणि माझ्याकडे पवित्र शास्त्रांतील लेख...किंवा कोणताही इतिहास, किंवा इतिहासातील काही संदर्भ जे असे दर्शवितात. की कोणी प्रोटेस्टंट किंवा कोणाचा बाप्तिस्मा हा "पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या" नावाने झाला जोपर्यंत नायसिया काऊन्सीलमध्ये कॅथोलिक चर्चने ते स्थापिले. आता, हे ध्वनीमुद्रीत होत आहे, हे संपूर्ण जगात गेले, सदतीस अशा वेगवेगळ्या भाषांमध्ये त्यांचे भाषांतर करण्यात आले आहे. जे समुद्रापलिकडे आहेत त्यांच्या मार्गासाठी मी देईन. हे खरे आहे. "पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा," ही एक खोटी, बनावट कॅथलिक मतप्रणाली आहे, आणि तो ख्रिस्ती बाप्तिस्मा नाहीए. खरे आहे! लुथरने तो कॅथलिक चर्च कडून आणला, कॅटकिजम बरोबर (ज्यामध्ये कॅथलिक पंथाची शिकवणूक सारांशात दिलेली आहे.) वेस्ली तेच घेऊन पुढे गेला. परंतु आता हे दिवस आहेत देवाच्या पुत्रांचे प्रगट होणे; जेव्हा जी गुजे व रहस्ये जी जगाच्या पायारंभापूर्वीपासून लपलेली होती ती प्रगट केली जातील. तोच हा काळ आहे. निश्चित.

217 आठवण ठेवा, या बायबलमध्ये असा एकही व्यक्ती सापडणार नाही ज्याचा बाप्तिस्मा हा "पिता, पुत्र, पवित्र आत्मा" यात झाला. कारण, शेवटच्या प्रेषिताच्या मृत्युनंतर जवळजवळ तीनशे वर्षांनंतर, तेथे कोणाचाही बाप्तिस्मा हा "पिता, पुत्र, पवित्र आत्मा." यात झाला नाही...मी दोन्ही पुस्तके वाचली आहेत, *प्री–नायसिन फादरर्स, द नायसिन काउन्सिल*, आणि त्यापासून त्यांनी संघटना केल्या, त्याला काय म्हटले आहे "ख्रिस्ती जागतिक मंडळी" आणि त्याच्यातून त्यांनी संस्था बनविल्या आहेत आणि त्यामध्ये आणावे म्हणून ते जबरी करीत आहेत, ते कॅथलिक चर्च आहे. *कॅथलिक* या शब्दाचाच अर्थ म्हणजे "जागतिक," एक जागतिक ख्रिस्ती मंडळी, जागतिक एकच मंडळी जी जग व्यापते. आणि हा ख्रिस्तीधर्म ते लोकांना जबरी करतात. तेथे त्यांनी काही बाहेरचे घेतले, रोमन लोकांची (विनस) प्रिती देवता काढून मरियेला जोडले गेले. त्यांनी...ज्युपीटर जो रोमी लोकांचा मोठा देव त्याला काढुन पौलाला जोडले. ते अजूनही मुर्तीपूजक आहेत! खरे आहे. कॅथलिक चर्च हे त्यांच्यातून आले, आणि पाचशे वर्षांनंतर...

218 लुईसवीले या ठिकाणी त्यांचे नाटक चालू आहे, तो *बेनहर* यांचा. अलिकडेच त्यांनी *टेन कमांडमेंट्स* हे बनविले. माझी अशी इच्छा आहे की जर त्यांना शक्य तर त्यांनी अंधार युगातील या पंधराशे वर्षांच्या काळातील एक भाग जर घेतला, व या काळातील मुर्तीपूजक लोकांनी कसा अतोनात छळ केला, ज्यांमध्ये त्यांनी लोकांवर जुलूम–जबरी करुन कसे ठार मारले, जीव घेतला, अत्यंत संवेदनशील असे कांसावर चढविले, एकावर बैल लादला आणि दुसऱ्या बाजूला ही बैल आणि असे केले की त्यांनी एकतर क्रुसाला चुंबन द्यावे नाहीतर ह्या किंवा त्या मार्गाने सुरुवात करावी. स्वित्झरलँड येथे मी माझा हात घातला होता एका खांबामध्ये जेथे ते उभे राहीले आणि त्यांची जीभ कापण्यात आली होती कारण त्यांना जादुगिरी करणारे आणि अशी अनेक नावे देण्यात आली होती. हे पूर्णपणे सत्य आहे. खरे आहे.

219 आणि तोच आत्मा आजही अस्तित्वात आहे. कायदे कानूनामुळे त्याला आवरण्यात आले आहे. त्याला स्वतंत्रता मिळेपर्यंत थांबा बायबल असे म्हणते. तितपर्यंत थांबा जितपर्यंत ते आपला रंग दाखवित नाहीत, त्यांना तशी संधी मिळणार आहे. तुम्ही फार लवकरच त्यासाठी तुमचे मतदान कराल, हे सर्व मला ठाऊक आहे. पाहा? ते येणार आहे. असा कोणता मार्ग नाही जो ते बाहेर घालविल. ते येणे आहे. हे सत्य आहे. ते येणे

आहे, ते येत आहे. म्हणून जेव्हा ते येतील, तुम्ही फक्त पाहा. परंतु, भावा, ही गोष्ट तुम्ही ओळखायला हवी, मला माहीत आहे मी कोणावर विश्वास ठेवला आहे. हालेलुयाह! योग्य रितीने मी कूच करीत आहे. पाहा हेच आहे.

220 तिथे अशी एक वेळ होती, जेव्हा—जेव्हा लेखक...लामसा—लामसा बायबलच्या लेखकाला, जेव्हा मी म्हणालो, जेव्हा त्याने पाहीले आणि त्याला पुरातन देवाचे चिन्ह दिसले, ते तंतोतंत होते, त्यामध्ये तीन लहान टिंब होते. मी म्हटले, "ते काय आहेत?"

तो म्हणाला, "ते देवाचे तीन गुणधर्म आहेत."

मी म्हटले, "म्हणजे पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा?"

त्याने माझ्याकडे पाहीले. तो म्हणाला, "तू ह्यांवर विश्वास करतोस काय?"

आणि मी म्हणालो, "होय महाशय."

221 तो म्हणाला, "मला त्याची पारख दिसली एका रात्री, मला वाटले तू प्रभूचा एक संदेष्टा आहेस." म्हणाला, "देव तुझे हृदय आशीर्वादीत करो." त्याने मला आलिंगन दिले, म्हणाला, "आता मला कळले तेच आहे." तो म्हणाला, "या अमेरिकन लोकांना हे ही माहीत नाही की काय आहे?" तो म्हणाला, "त्यांना ते माहीतही नाही." म्हणाले, "ते पूर्वेकडील एक पुस्तक घेऊन त्यांतून पाश्चिमात्त्य पुस्तक काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांना त्यांचे बायबलही ठाऊक नाहीए." तो म्हणाला, "तेथे असे कोणतेही दुसरे नाव या आकाशाखाली देण्यात आले नाही, कारण प्रत्येकांचा बाप्तिस्मा हा येशू ख्रिस्ताच्या नावाने झाला आहे एका देवामध्ये तीन व्यक्ती सारखे काहीही नाहीए." आणि ते आहेत, भाऊ लामसा, डॉक्टर लामसा, ते लामसा बायबलचे भाषांतरकर्ते आहेत, ते हसिनहोवर यांचे फार जवळचे मित्र असून जगातले महान राजनैतिक मान्यवर आणि अनेक त्याच्या ओळखीचे आहेत अशा व्यक्तीने मला मिठीत घेतले व म्हणाले, "या कारणासाठी ते तुला गोळी झाडतील कधीतरी," परंतु म्हणाला, "आठवण ठेवा ही लोकं काही कारणांसाठी मेली गेली."

222 मला ते आवडेल जेव्हा त्या वृध्द पेत्राला तुरुंगात डांबवले होते त्यासारखे होईल. तेथे एक मुलगा होता आणि तो फार चिंताग्रस्त होता. आणि तो म्हणाला, "ओह, काय झाले?"

तो म्हणाला, "तुला माहीत आहे की तुझी शिक्षा अंमलात येणार आहे?"

पेत्र म्हणाला, "होय."

तो म्हणाला, "होय, तू आज मरणार आहेस."

तो म्हणाला, "होय."

तो म्हणाला, "ते—ते तुला...तु घाबरत नाहीये का?"

तो म्हणाला, "नाही."

तो म्हणाला, "त्या ख्रिस्ती म्हटलेल्या पैकीच तू असणार."

तो म्हणाला, "होय."

म्हणाला, "काय झाले?"

223 आणि तो त्याला म्हणाला, तो बसला आणि त्याने त्याला गोष्ट सांगितली. आणि जसे ते बोलत गेले, खाली आला. तो म्हणाला, "आणि मी आजच्या सकाळी मुक्त झालो असतो, मी त्यांच्या काही संप्रदायात जाऊ शकलो असतो आणि सहभागी झालो असतो,

आणि असेच जगलो असतो. पाहा. मी मुक्त झालो असतो. परंतु मी शहराच्या वेशीजवळ सुरुवात केली, आणि मी कोणा एकाला येताना पाहीले, आत चालत येत आहे. मी त्याला ओळखले तो कोण होता, मी म्हणालो, 'प्रभू, तू कुठे जात आहेस?' त्याने म्हटले, 'मला परत क्रुसावर दिले जाणार आहे,'" म्हटले, "तिकडे परत जातोय."

224 त्यानंतर ते म्हणाले, "कोणाचे नाव शिमोन पेत्र आहे?"

म्हणाला, "मी येथे आहे!"

म्हणाला, "आम्ही तुझ्यासाठी तयार आहोत."

म्हणाला, "मी तुमच्यासाठी थांबलो आहे." सरळ चालत बाहेर पडा.

225 त्या मुलाने त्याच्या खांद्यावर स्पर्श केला आणि म्हणाला, "शिमोन एक मिनट थांबा. मी ही त्या देवाला स्विकारतो! आणि आता मला भिती नाही; मी त्यानंतरचा असू दे." हे खरे आहे. हालेलुयाह!

ठेवा...हे ठिबकणारे रक्त, होय, हे ठिबकणारे रक्त!
हे पवित्र आत्म्याचे शुभवर्तमान रक्तासह ठिबकते,
शिष्यांचे रक्त जे सत्यासाठी मेले गेले,
हे पवित्र आत्म्याचे शुभवर्तमान रक्तासह ठिबकत आहे.

पवित्र आत्म्याच्या या योजनेत, पहिला जो मरणारा होता,
तो योहान बाप्तिस्मा करणारा, परंतु मनुष्यांसारखा मरण पावला;
त्यानंतर आला प्रभू येशू, त्यांनी त्याला क्रुसावर दिले,
त्याने प्रचार केला असा की आत्म्याने मनुष्यांना पापापासून वाचवावे.

तेथे पेत्र आणि पौल होते, आणि योहान साक्षात्कारी,
त्यांनी आपले जीवन दिले असे की हे शुभवर्तमान चमकेल;
त्यांनी आपले रक्त ही मिसळू दिले, जसे जून्या संदेष्टे यांनी केले होते,
म्हणून खरे देवाचे वचन हे प्रामाणिकपणे सांगितले जावे.

तेथे वेदीखालील आत्मे, ओरडतात "अजून किती वेळ?"
ज्यांनी पाप केले त्यांना शासन व्हावे; (ऐका!)
परंतु तेथे त्याहूनही अधिक जे आपले जीवनाचे रक्त देतील,
या पवित्र आत्म्याच्या शुभवर्तमानासाठी आणि किरमिजी पुरासाठी.

हे ठिबकणारे रक्त, होय, हे ठिबकणारे रक्त,
हे पवित्र आत्म्याचे शुभवर्तमान हे रक्तासह...ठिबकते!
शिष्यांचे रक्त जे सत्यासाठी मेले गेले,
हे पवित्र आत्म्याचे शुभवर्तमान हे रक्तासह ठिबकते.

226 आम्ही जाण्याअगोदर एक शास्त्रवचन,

*...आणि ते पेत्र...व इतर प्रेषित ह्यांना म्हणाले, बंधुजनहो,* आम्ही काय करावे?

*...पेत्र त्यांना म्हणाला, पश्चाताप करा, आणि तुमच्या* पापांचे मोचन *व्हावे म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे* तुम्हाला *पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.*

*कारण हे वचन तुम्हाला, तुमच्या मुलाबाळांना व* जे दूर आहेत *त्या सर्वांना म्हणजे जितक्यांना परमेश्वर आपला देव स्वत:कडे बोलावील तितक्यांना दिले आहे.*

227 आता प्रभू आशीर्वाद देवो. आम्ही मार्गातून जात असताना. तुम्ही बाप्तिस्मा पाहू शकता...?...

***दत्तकपणा*** *३* MAR60-0522M

(Adoption ³)

***दत्तकपण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी सकाळी, 22 मे, 1960 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org